# आम्ही पार्लेकर

१९९१ पासून

प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३२ वे    अंक नववा    पृष्ठे १२    सप्टेंबर २०२३    www.parlekar.com

Registered-RNI no. 54781/92



या अंकात

पान ०२ सुवर्णप्रवासाच्या पाऊलखुणा

पान ०५ New Age and rise of the UNICORNS

पान ०६ अपारंपरिक उर्जेची परंपरा

पान ०८ विसरलेले समाज - ५ : अक्रोटीरी




पान ४

'काम करताना मजा आली पाहिजे'

- विराट बापट

# 'गोविंदा रे गोपाळा' म्हणत विलेपाल्यातील पहिल्या गोविंदा पथकाचा यशस्वी दहिकाला

७ सप्टेंबर रोजी दहिकाला उत्सव महाराष्ट्राभर आनंदाने साजरा झाला. या वर्षी पार्ल्यामधील 'श्री जय हनुमान व्यायाम शाळा, रामवाडी' या जुन्या जाणत्या गोविंदा पथकाने आपल्या दहीकाला उत्सवाची ६८ वर्षे पूर्ण केली. ६८ वर्षापूर्वी स्थापन झालेल्या या गोविंदा पथकाने पार्ले नगरीसोबतच बोरीवलीपर्यंत आपले नाव राखत उत्तम असा सहा थरांचा मनोरा रचला. तसेच पार्ल्यातील लोकप्रिय दिवंगत माजी नगरसेवक श्री शशिकांत पाटकर यांनी सुरू केलेल्या हनुमान रोड येथील मानाच्या दहीहंडी उत्सवाची तसेच श्रद्धानंद मार्ग, हनुमान मार्ग चौकातील विलेपार्ले लोकसेवा मंडळाची दहीहंडी फोडण्याचा मान देखील 'श्री जय हनुमान व्यायाम शाळा, रामवाडी' या पथकाला लाभला.

'पथकातील सर्व गोविंदांची सुरक्षितता, शिस्त आणि आपली उज्ज्वल परंपरा जपण्याची जबाबदारी आमच्यावर आहे. या दहीकाला उत्सवातून तसेच वर्षभरात साजऱ्या केल्या जाणाऱ्या अशा अनेक उत्सवांच्या माध्यमातून आम्ही ती जपत आहोत' अशी भावना संस्थेचे सचिव श्री सिद्धेश चंद्रकांत पवार यांनी 'आम्ही पार्लेकर'शी बोलताना व्यक्त केली.





## ठाकरे क्रिडा संकुलातील विद्यार्थ्यांची भारतीय संघात निवड



२३ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०२३ पासून चीन मधील हेंग झेऊ शहरात होणाऱ्या १३ व्या आर्टीस्टिक स्केटिंग एशियन गेम्स स्पर्धेसाठी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती संचालित प्रबोधनकार ठाकरे संकुलाच्या याशवी शाह व राहुल येलूरी यांची निवड झाली आहे.

तसेच कुंज चोकशी - गुजरात, वाकाशा नगुला लक्ष्मी नारायण - चेन्नई, आकुलासाई सांमंता - आंध्र प्रदेश, अभिजित अमल राज- केरला, दोंत्रा ग्रिष्मा - आंध्र प्रदेश. इत्यादी भारतातील खेळाडूंची निवड या स्पर्धेसाठी झाली आहे.

प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलाचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू, सचिव डॉ. मोहन अनंत राणे संकुलाचे प्रशिक्षक आदेश सिंग व पी. के. सिंग यांचे मोलाचे मार्गदर्शन यशवी शाह व राहुल येरुरी यांना लाभले आहे या दोघांच्या निवडीबद्दल सर्वत्री आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.





sales@atharvlifestyle.com | www.atharvlifestyle.com | Atharv Aaradhyam, Chandrashekhar CHS, Vijay Nagar, Sahar Road. | MAHARERA NO.: P51800052443

## संपादकीय

मी नेहमी गंमतीत म्हणतो की ज्याप्रमाणे पंजाब सारख्या सीमाप्रांतात रहाणाऱ्या कुटुंबातील एकतरी व्यक्ती सैन्यात असते त्याचप्रमाणे पार्ल्यातीत कुटुंबातील एकतरी व्यक्ती परदेशी असते. त्या अर्थाने आपल्याला नागपूरपेक्षा न्यूयॉर्कच जवळ आहे असे म्हटले तर ती फार अतिशयोक्ती ठरु नये. सांगायचे तात्पर्य हे की परदेशाशी, विशेषत: अमेरिकेशी तर आम्हा पार्लेकरांचे जन्मजन्मांतरीचे नाते आहे. अनेक घरांमधे तर एकवेळ भारताचा नकाशा नसेल पण अमेरिकेचा मोठ्ठा नकाशा भिंतीवर ऐटीत विराजमान असतो.

अमेरिकेत किती टाइम झोन आहेत? कोणत्या शहरात (अर्थात अमेरिकेतील) आत्ता किती वाजले असतील? कुठे किती बर्फ पडतो? तिकडे जायला कुठले महिने चांगले? कोणती एअरलाईन चांगली? तिकिटांचे दर सर्वात कमी कधी असतात? खायचे पदार्थ चेक इन बॅगेतून न्यावे की नाही? पार्ल्यातील ज्येष्ठ लोकांच्या गप्पांमधे हेच विषय हिट असतात. महाराष्ट्रातील दुष्काळापेक्षा अमेरिकेतील आयटी कंपन्यांतील लेऑफ मुळे आम्ही जास्त चिंतातूर होतो. सध्या 'तिकडील' नोकरीची, व्हिसाची परिस्थिती तितकीशी चांगली नसल्याने पार्ल्यातील अनेक घरांवर डौलाने फडकत असलेला अमेरिकेचा ध्वज सध्यातरी अर्ध्यावर उतरवला गेला आहे व बायडन काकांच्या नावाने बोटे मोडणे सुरु आहे.

अमेरिकेत पायाभूत सोयी चांगल्या आहेत, ऑफिसात व इतरत्रही वातावरण मोकळे ढाकळे आहे, पैसे कमवायच्या तसेच उडवायच्या अगणित संधी आहेत हे नाकारण्याचे कारण नाही मात्र एका बाबतीत आपली मुंबई निर्विवादपणे सरस आहे, ती म्हणजे वैद्यकीय सेवा. ती फक्त स्वस्त आहे असे नाही तर दर्जात सुद्धा कुठेही कमी नाहीये. सर्वात महत्वाचे म्हणजे ज्या सहजतेने इथे आपण डॉक्टरांकडे जाऊ शकतो तसे तिकडे शक्य नसते. इमर्जन्सी नसेल तर अपॉइंटमेंट मिळायलाच अनेक दिवस लागतात. मानवी चेहेरा नसलेल्या व पूर्णपणे इंशुरन्स व फार्मा कंपन्यांच्या विळख्यात सापडलेल्या अमेरिकन वैद्यकीय सेवेची अवस्था बिकट आहे.

मित्रांनो एक लक्षात ठेवा, फिरायला, मजा करायला अमेरिका भलेही 'ड्रीम डेस्टिनेशन' असेल पण आजारी पडावे ते भारतातच!

पार्लेकर

संपादक
ज्ञानेश चांदेकर

संपादकीय सहाय्य
तानिया गायकवाड
editorial@parlekar.com

जाहिरात व्यवस्थापन
भावेश शिंदे
marketing@parlekar.com

सजावट व मांडणी
विश्वास महाशब्दे – ऐस ग्राफिक्स

निर्मिती
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई–४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई–मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

# सुवर्णप्रवासाच्या पाऊलखुणा

भारत एकेकाळी सुवर्णभूमी म्हणून ओळखला जात होता. आज काळ बदलला,



बचतीचे मार्ग बदलले, जीवनमान बदललं, तरी आजही भारतीय जनमानसात सुवर्णाच आकर्षण मात्र कायम आहे. आज मुली बाहेर फिरताना, लग्न समारंभातही कल्चर दागिने घालतात. मात्र स्वत:चं कार्य निघालं की त्यांना सुवर्णलंकारच हवे असतात. रोज वापरायला त्यांना एखादी तरी नाजूकशी चेन, ब्रेसलेट, अंगठी हवीच असते. मुलगेही याबाबतीत काही कमी नाही. गळ्यातील चेन, ब्रेसलेट अस मिरवणं त्यांनाही आवडतच. म्हणूनच कोविड नंतर फार कमी काळात सोन्याचे भाव दुप्पट झाले तरी सोनारांच्या दुकानातली गर्दी मात्र काही कमी होत नाही.

पार्लेकरांच्या या सुवर्ण आवडी पुरवतात मुसळुकर ज्वेलर्स. आज पार्ला मार्केटमध्ये दोन दुकानं थाटून नव्या जुन्या पिढीच्या आवडी पुरवणारे हे मुसळुणकर ज्वेलर्सचे मालक श्री सुहास मुसळुणकर त्यांच्या व्यावसायिक वाटचाली बद्दल सांगत होते. त्यांचे आजोबा कै. महादेव बळवंत मुसळुणकर व वडील श्री वसंत महादेव मुसळुणकर दोघेही उत्तम कारागीर होते. वडिलांनी १९४९ मध्ये पार्ल्यातील त्यांच्या वडिलांचे राम मंदिर कंपाउंड मध्ये असलेल्या दुकानात सोन्याचे दागिने घडविण्याच्या व्यवसाय सुरू केला. वडिलांचा जनसंपर्क खूप मोठा त्यामुळे सुरुवातीला दुरुस्ती, पॉलीश अशी कामे करता करता लहान दागिन्यांच्या ऑर्डरी त्यांना मिळायला लागल्या पण तरीही ९० सालापर्यंत व्यवसाय फारसा वाढला नव्हता. श्री सुहास यांनी आपल्या पिढीजात व्यवसायात उतरायचे ठरवले मात्र त्यांना तो कारागिरी पर्यंत सिमीत न ठेवता वाढवायचा होता. त्यामुळे सुरुवातीला ९० सालात एक लाख रुपये कर्ज घेऊन त्यांनी ३५० ग्रॅम सोन्याचे दागिने बनवले व विक्रीला ठेवले. स्वत:च्या व्यवसायाची सुरुवात केली. सर्व बालपण पार्ल्यातच गेलेले असल्याने व वडिलांचा जनसंपर्क यामुळे लोकांचा विश्वास मिळवणे सोपे गेले. व्यवसाय वाढत गेला. त्यांच्या दुकानातील अर्धा भाग दुसरा व्यावसायिक वापरत होता. त्यामुळे दुकानाला चांगला दर्शनी भाग मिळत नव्हता.अशा वेळी धाडसी निर्णय घेऊन त्याला दामदुप्पट किंमत देऊन सुहास यांनी दुकान मोठे केले व सजवले.

मधल्या काळात भारत सरकारचा गोल्ड कंट्रोल ऍक्ट काढला गेला. त्यामुळे व्यवसायाला नवे वळण लागले. त्यावेळी पार्ल्यात अनेक मराठी सुवर्ण व्यावसायिक होते. पण सुहास यांनी आपल्या नवनवीन कल्पना, दागिन्यांच्या कलाकृतीचा अभ्यास व शोध घेत ग्राहकांना जुनी व नवीन अशी मोठी विविधता देऊ केली. त्यामुळे व्यवसायाची भरभराट होत गेली. चोख माल, विश्वासू व्यवहार व दागिन्यांची विविधता यामुळे पार्लेकरांची पसंती मसळुणकर ज्वेलर्सना मिळत गेली.

याच काळात व्यवसायाचे स्वरूप बदलत गेले. सरकारी नियमही बदलले. त्याचा परिणाम म्हणजे कारागिरी व्यवसाय व सुवर्ण पेढी हे दोन वेगवेगळे व्यवसाय झाले. त्यामुळे अलंकार भारतातील सर्व भागांमधून बनवून येऊ लागले. त्याचप्रमाणे पूर्वी सुवर्ण अलंकारांनाच व जुन्या




पारंपारिक डिझाईनलाच मागणी होती. आज मराठी पारंपारिक दागिन्यांबरोबरच राजस्थानी, कर्नाटकी, दक्षिणी, बंगाली अशा वेगवेगळ्या डिझाइनना मागणी असते. त्यातही कमी वजनाच्या नाजूक दागिन्यांची मागणी वाढली आहे. त्याला बदलत जाणारे सामाजिक स्वरूप व सोन्याचे गगनाला भिडलेले भावही कारणीभूत आहेत. आज राजकोट,कलकत्ता, गोकाक, बंगलोर येथून दागिने जास्त प्रमाणात येतात. कारागीरात मराठी गुजराती व राजस्थानी कारागिरांची संख्या कमी होऊन बंगाली कारागिरी वाढले आहेत. जे अतिशय मेहनती आहेत. आज सुवर्णालंकारांबरोबरच मोठ्या प्रमाणात हिरा व इतर नवरत्ने यांचे दागिने, चांदीचे अलंकार, तसेच प्लॅटिनमचे, रोज गोल्डचे दागिने यांना तरुण पिढीची जास्त पसंती आहे. मात्र आजकाल चार चार दिवस सुरू असलेल्या लग्नकार्यात कोल्हापूरच्या पारंपारिक दागिन्यांनाही तेवढीच मागणी असतेच.

आज सरकारने हॉलमार्किंग कायदा केल्याने भारतात कुठूनही दागिने विकत घेणे व विकणे सोपे झाले आहे. पूर्वी सेल्स टॅक्स होता तो जाऊन जीएसटी आला. त्यामुळे बॅक ऑफिसच्या कामात फार वाढ झाली आहे. पण चांगल्या लोकांसाठी ते उपकारकही आहे. पूर्वी सोन्याची वळी किंवा लगड घेऊन ठेवणे लोक पसंत करत. पण दोनदा जीएसटीमुळे आता तयार दागिने विकत घेणे ग्राहकांच्या फायद्याचे आहे. तसेच देशाच्या आयात निर्यातीसाठीही फायदेशीर आहे.

हे सारे असले तरी या व्यवसायाला भारतात कधीच मरण नाही. मात्र इतर व्यवसायांप्रमाणेच इथेही काळाप्रमाणे बदलत राहणे जरुरीचे आहे. तो शिरस्ता राखल्यामुळेच आज मुसळुणकरांनी घोडदौड चालू ठेवली आहे. चांदीची भांडी व त्यातील वेगवेगळे घाट, नक्षी यामुळे चांदीच्या ग्राहकांची संख्या जेव्हा वाढली. त्यावेळी चांदीचे व सोन्याचे अशी दोन दुकाने करायचे ठरवले. विजय स्टोअर्स समोरील दुकानात चांदीची भांडी, वस्तू, मूर्ती, याचबरोबर आज ट्रेंडमध्ये असलेले चांदीचे दागिने यांची शोरूम बनवली. जी आज त्यांचे धाकटे भाऊ श्री. सुजन मुसळुणकर बघत आहेत. तर रेलकॉन हाऊस मध्ये सुसज्ज शोरूम तयार करून येथे सर्व प्रकारचे सुवर्ण अलंकार, पोवळे मोती पोवळ, डायमंडचे व प्लॅटिनम दागिने मिळू शकतात.

आज सुहास यांचे दोन्ही मुलगे सागर व क्षितिज हे वडिलांच्या बरोबरीने व्यवसायात उतरले असून नवीन कल्पना व जबाबदाऱ्या घ्यायला सज्ज झाले आहेत. सागरने जेमॉलॉजिकल इन्स्टिट्यूट ऑफ अमेरिका यांचा अभ्यासक्रम पूर्ण केला असून त्याचे राम मंदिर रोडवरील अवेन्यू ५७ येथे चौदाशे फुटाचे डायमंड बुटिक सुरू करणार आहे. तर क्षितिजिने रेलकॉन मधील दुकाना शेजारी अजून एक दुकान घेतले असून तो तेथे सुवर्ण अलंकार, पोवळे, मोती, नवग्रह यांची शोरूम सुरू करत आहे. जी गुडी पाडव्यापासून ग्राहकांच्या सेवेत रुजू होईल.

साडेतीनशे ग्रॅम सोन्यापासून सुरू झालेला हा प्रवास आज २०२३ मध्ये तीन सुसज्ज शोरूम पर्यंत येऊन पोहोचला आहे. कर्तुत्वाची ही चढती कमान सांभाळताना वाडवडिलांचे आशीर्वाद, भावाची साथ व मुलांची व्यवसायाची ओढ,जिद्द ही तर सुहास यांना लाभली आहेच पण पत्नी भक्ती यांच्या सहकार्याशिवाय हा टप्पा काढणे कठीण होते. माणसाची जिद्द, चिकाटी, अविश्रांत श्रम, ज्ञानलालसा व ग्राहकांची संतुष्टता केवढे यश देऊन जाते याचे मुसळुणकर ज्वेलर्स हे उत्तम उदाहरण पार्लेकरांसमोर आहे.



संगीता बेहेरे
९८६७७५८३१०

# मिलें न फूल तो..

एका रात्रीत घडणाऱ्या कथानकांवर अनेक हिंदी चित्रपट सृष्टीत आले आहेत. असाच एक थ्रिलर चित्रपट.. 'अनोखी रात'..

नावावरूनच लक्षात येतं की कथा काय असेल. संपूर्ण चित्रपट एका रात्रीत घडतो.



वयोवृद्ध आजोबा बद्रीप्रसाद आणि त्यांची नात जाहिदा आपल्या बंगल्यात आपली तत्व सांभाळून शांतपणे जीवन व्यतीत करत असतात. एक दिवस कळतं की मुलाने घेतलेल्या कर्जात बद्रीप्रसाद इतके बुडालेत की राहता बंगला आणि त्यातील वस्तू, विशेषत: कौतुकाने जमवलेल्या मौल्यवान मूर्ती यांचा लिलाव करण्याची वेळ आली आहे. त्यासाठी ज्याच्याकडून कर्ज घेतलं तो मदन.. तरुण बोस.. त्याच्या वकिलासह, बंगला विकत घेण्यासाठी आलेलं जोडपं रायसाहेब आणि त्यांची तरुण पत्नी अरुणा इराणी, बंगल्यात येतात. जोरदार वादळी पाऊस सुरू होतो. जाहिदा यजमानपदाला जागून पाहुण्यांच्या जेवणाची व्यवस्था करते. पावसामुळे अचानक काही पाहुणे वाढतात. गायक, चित्रकार परीक्षित सहानी आणि त्या भागातील कुप्रसिद्ध डाकू बलदेवा आणि त्याचे साथीदार. बदललेल्या परिस्थितीतही आपलं यजमानपद न विसरलेली जाहिदा त्यांना ही जेवू घालते. हळुहळु बोलता बोलता प्रत्येक जण मोकळा होतो आणि आपापली व्यथा सांगत व्यक्त होतो ही चित्रपटातली कथा.

फुकट जेवणार नाही या अटीवर जेवणारा गायक चित्रकार परीक्षित सर्वांची स्केचेस काढतो आणि सर्वांसाठी गाणं सादर करतो. आपलं आयुष्याचं तत्व गाण्यातून मांडतो. 'मिलें न फूल तो..' आयुष्यात प्रत्येक दान आपल्या मनासारखं पडत नाही.. जे आणि जसं आयुष्य सामोरं येईल, तसं उमेदीने जगत जावं.. ही एका परीने प्रत्येक व्यक्तीची कथा आहे. त्याच बरोबर तो जाहिदासहच्या काही क्षणांच्या सहवासाने, तिच्या व्यक्तिमत्वाने प्रभावित झाला आहे. गीतकार कैफी आजमी त्याचं अबोल प्रेम ही व्यक्त करतात. खुदा तराश लिया और बंदगी कर ली.. जुबाँ खुली भी न थी.. और बात भी कर ली.. या चित्रपटात एकूण पाच गाणी. ओह रे ताल, मिलें न फूल, मेहेलों का राजा, दुल्हन से तुम्हारा, मेरी बेरी के.. प्रत्येक गाणं आपल्या जागी मास्टरपीस. संजीव कुमार वर चित्रित गाणी मुकेश यांनी गायली आहेत. हे गाणं मात्र रफी साहेबांच्या मखमली स्वरात आहे. गाण्यांच्या चाली रोशन यांनी बांधल्या आहेत, तर संगीत संयोजन सलील चौधरी यांचं.



जाहिदा चित्रपटात प्रभाव पाडून जाते. अतिशय देखण्या परीक्षित सहानी यांचा हा पहिला चित्रपट. या चित्रपटाकरिता त्यांनी अजय सहानी हे नाव घेतलं होतं. रूढार्थाने परीक्षित सहानी नायक असले, तरी आधीचा साधा भोळा, नंतर खुनाचा आरोप आल्यावर फरार होऊन डाकू झालेला संजीव कुमार आपला प्रभाव पाडून जातो. अभिनेत्री जाहिदा हिची रमा/ गोपा ही दुहेरी भूमिका उत्तम. चित्रपट संपतो तेव्हा आपल्या मनात, प्रिय पत्नीच्या विरहात जळणारा संजीव कुमार रेंगाळत राहतो. पोलिसांच्या गाडीतून जाणाऱ्या बलदेवाचे जळत्या निखाऱ्यासारखे डोळे आपला पाठपुरावा करत राहतात.



अनुश्री क्षीरसागर
९८२०५०९७६२



# ‘काम करताना मजा आली पाहिजे’ - विराट बापट

विराट बापट हा पार्ल्यातला हरहुन्नरी मुलगा. कित्येक मुलांना लहानपणापासूनच आपण मोठेपणी कोण होणार ते माहीत असतं किंवा त्यांनी तसं ते ठरवलेलं असतं. परंतु विराटचं तसं नव्हतं. त्यामुळे लहानपणी पार्ले टिळक विद्यालय, इंग्रजी माध्यम येथे शिकल्यावर दहावीनंतर काय ? असा प्रश्न निर्माण झाला तेव्हा विराटने विज्ञान शाखा निवडली. त्यानं ते योग्यच



केलं असं म्हणावं लागेल कारण विज्ञान शाखा निवडली की बारावीनंतर या शाखेत पुढे पुष्कळ पर्याय उपलब्ध होऊ शकतात, त्यांचा आपण लाभ घेऊ शकतो.

त्यामुळे बारावीनंतर काय करायचं असा विचार करता त्याच्या कानावर प्रॉडक्ट डिझायनिंग या कोर्सची माहिती मिळाली. आपले काही मित्र या कोर्सला गेले आहेत असंही त्याला कळलं. त्यामुळे विराटनं पुण्यात सिंबायसिस येथे बॅचलर ऑफ डिझाईन्स पदवीसाठी प्रवेश घेतला. प्रवेश घेण्याआधीची निवडप्रक्रिया मोठी असते. निवड व्हावी म्हणून विराटने खूप मेहनत घेतली. कॉलेज सुटलं की तो वरळीला कोळी वाड्यात मूर्ती बनवायला जायचा, एकाच वस्तूची विविध कोनांतून असंख्य चित्र काढायचा. ह्या सगळ्याचा परिणाम म्हणजे प्रवेश परीक्षेत विराट पहिला आला.

कोर्स शिकताना आपल्याला हा विषय खूप आवडतोय हे विराटला जाणवू लागलं त्यानंतर यथावकाश उत्तीर्ण झाल्यावर विराटने त्याच क्षेत्रात काही काळ इंटर्नशीप करून अनुभव घेतला.

सध्या विराट वांद्रे येथील विद्यापीठात हाच कोर्स शिकवतो आहे. त्याचसोबत त्याने प्रॉडक्ट डिझाईनचा स्वत:चा व्यवसायही काढलेला आहे. मधल्या काळात त्याने इटली येथील पॉलिटेक्निको दि मिलानो ह्या नामांकित संस्थेतून डिझाईन मॅनेजमेंट या विषयात मास्टर्सही केलं पण मायभूमीला यायचा निर्णय पक्का असल्याने तो शिक्षण संपल्यावर परत आला.

विराटचं म्हणणं असं की ’आपल्याला जे काम करायला आवडतं ते करण्याची संधी मिळाली तर त्यातून खूप आनंद मिळतो. शिवाय नवनवीन प्रयोग करून पाहाण्याची ओढही वाटते



आणि चांगलं काम केलं तर पैसा हा त्यातून पुढे येतोच.

विराटने आत्तापर्यंत अंजली, पार्क ॲव्हेन्यू, झेन मोबाईल अशा नामांकित ब्रॅंडसाठी काम



केलं आहे. स्वत:चा व्यवसाय करताना सुरुवातीला अडचणी आल्याच कारण आपण काम व्यवस्थित, वेळेवर आणि जीव तोडून करून दिलं तरी त्याचे पैसे वेळेवर न मिळणं, कमी मिळणं किंवा क्वचित अजिबात न मिळणं असाही अनुभव आला. अर्थात त्याने खचून न जाता काही व्यावहारिक गोष्टी कामाच्या आधीच नक्की केल्या पाहिजेत हा धडाही मिळाला. काही चांगले अनुभवही आले. त्या सर्वातून शिकत, मात करून विराट आज जवळजवळ आठ वर्षं या व्यवसायात आहे.


विराटच्या आई डॉ. आसावरी बापट या संस्कृत आणि भारतीय संस्कृतीच्या अभ्यासक आहेत. सध्या त्या नेपाळ येथे भारतीय दूतावासात सांस्कृतिक केंद्र प्रमुख म्हणून कार्यरत आहेत त्यांनी आणि वडील श्री उदय बापट ह्यांनी विराटला नेहमीच प्रोत्साहन दिलं आणि ’तू तुला आवडेल ते कर.’ ’असा मुक्त हस्त दिला त्यामुळेच हे शक्य झालं.’ असं विराट नम्रतेने नमूद करतो.

अजून पल्ला खूप गाठायचा आहे याची त्याला कल्पना आहे परंतु आपण योग्य मार्गावर चाललो आहोत हा विश्वास पाठीशी असताना आणखी काय हवं ?





सविता दामले
९९३०३ ११५४६






# New Age and rise of the UNICORNS

We are fortunate to be in the age and times when the pace of change in the business has become very fast. New business entities, now commonly known as "Startups" get founded, funded, and grow in market value in a short time. Many of these businesses did not exist before. Most of them could not have been even imagined a mere thirty years back. Technology advancement has played a large role in defining and making these businesses possible. Encouragement to Startups, Investment culture and systems have enabled new business animals to be born and grow to a size and get named the "UNICORN." A UNICORN is not a mythical animal with a horn but a term invented by a venture capitalist named Aileen Lee. A UNICORN is a funded business enterprise whose market value is assessed by investors to be more than $ 1 Billion. In Indian currency terms, a company with a market value more than Rs 8300 crores or so is eligible to be called as a UNICORN. It may be noted that many of these startups, while doing losses in business in first few years have high market valuations based on future business potential. Fortune 500 lists are well known and now a new list of these UNICORNS is catching the attention of all. This UNICORN list keeps changing very rapidly and many companies move in and out of this list quite fast.

In this article let us look at a broader view of new businesses, their unique business models, and demographic distribution. We would examine individual type of business models in details in later articles as a series on new age business ideas.

The current number of unicorns is reported to be more than 1200 and they are well spread geographically all over the globe. In terms of locations, more than half of these companies are founded in the U.S.A. The second number is attained by China. Next in line is India. India is followed by U.K., Germany, and France.

The largest of the Unicorns is a Chinese company named "Byte Dance" with a reported valuation of about Rs. 18 Lakh




crores. The company owns the famous social media platform company called TikTok.

Second number is of a company named SpaceX with Value about Rs. 10 lakh crores. This company is founded by famous Elon Musk and others and works in space exploration and future age technologies. It is in the business of satellites and space travel also.

Third largest company "Shein" with Value about Rs. 5 lakh crores, is a fashion retailer founded in Nanjing, China and head quartered in Singapore. This company focuses on women's ware, Men apparel, bags, shoes, and accessories. It is interesting that it could achieve this value doing traditional business in a way.

In a bottom-heavy distribution of sorts, out of these UNICORNS only about 50 have value more than $ 10 Billion.

In terms of type of industry, Technology firms top the list with about 30%. Financial Services and Consumer and Retail follow together with about 18%. Industrial sector 15% and Healthcare and Life Sciences 10% are upcoming and Media & Entertainment 7% are not far behind.

In terms of age, all these firms are relatively young and have been founded in last about 10 years or so. In short, their speed of progress is breath taking. While the oldest Unicorn is a French firm "Veepee" founded in 2007, more than 30 got added in first seven months of this year 2023 itself.

Interestingly a google backed firm named Anthropic got added in the list this year, after becoming more than $1 B in value and quickly grew four times to its current value in a few months. Anthropic was founded in just 2021 by people who previously worked for OpenAI, the makers of Chat GPT now famous world over for Artificial Intelligence. Anthropic would be a competitor to Chat GPT with a product called as Claude.

**The India stories.**

India is reported to have about 70 Unicorn companies. In addition to these 70 companies there are many more Unicorn companies, founded outside India but founders are Indians. Apart from founding unicorns, In the new technology age, Indians are proving their worth as CEOs in almost all major companies. As on date about 35 major companies with total turnover more than $ 1000 Billion or $1 Trillion have Indian origin CEOs. India has really cemented its place on top of the pyramid in this space.

In India, companies like Byjus, OYO, Swiggy, Dream 11, Razor Pay, NSE and OLA to name a few are best examples of UNICORNS. Its worthwhile to note that these companies come from multiple sectors but have one thing in common. All these companies could not have existed without the new technology. Technology is the backbone and a differentiator for all these companies. Indians have proved their worth in technology and are thus occupying positions of importance in these companies as well as companies outside India.

Unicorns in India are located mostly in cities. Bangaluru leads with about 45% with Mumbai and National Capital region vying for second spot with about 20% each.

Pune is leading with 5 unicorns in other cities in India and is fast progressing in terms of upcoming businesses.

In terms of new age business OLA which started as an aggregator for taxi business has diversified in to manufacturing of electric vehicles and is doing exceedingly well. The combined market value of OLA and OLA electric is supposed to be more than $ 13B.

What goes up must come down.

Its true that many of the Unicorns are struggling to remain viable and like the old saying, decline in value also very fast. Companies like Byjus, OLA, Zomato appear to be in difficulty in managing their profitability. A few are also plagued with issues like law suits. It appears that becoming a Unicorn quickly is easier than staying there and sustaining the market woes.

We will take a closer look in to typical business models of these UNICORNS in next articles in this series.



मिलिंद जोशी
९८१९७ ९७२५८

Discover Your Perfect Partner with Bhagyaroop Vivah,
Where Tradition Meets Modern Matrimony!

In the realm of modern matrimony, Bhagyaroop Vivah is your trusted guide, balancing your contemporary desires with timeless traditions. We understand your journey is unique, and so is your life partner. Discover the harmony of love and compatibility with us.



- Serving the Hindu community across countries and cultures.
- Rapidly growing platform balancing tradition and innovation.
- Curated matches based on personal preferences.
- Personalized matrimony services that offer a secure and interactive experience
- Emphasis on verified profiles for authenticity.
- A secure and stress-free environment for interactions.
- Exclusively catering to educated never-married graduates and post-graduates.

भाग्यरुप विवाह

Contact us at:
www.bhagyaroopvivah.com
+91-9209247183 / +91-9769338475

Follow us on:
/bhagyaroopvivah1
/bhagyaroopvivah

# अपारंपरिक उर्जेची परंपरा

पारंपरिक ऊर्जेचा वाढता वापर आपले आयुष्य आणि भविष्य जास्त अंधकारमय करत आहे, ही गोष्ट आपल्या देशात, आपल्या प्रांतात, आपल्या भागात अद्यापही म्हणावी तशी गांभीर्याने घेतली जात नाही. आपण आपले जीवन अधिकाधिक सुखकर करण्यासाठी जास्त मेहनत करत असतो. दिवसाचे १५-१७ तास देखील काम करतो, पण हे सगळं करताना कितीतरी जास्त वीज वापरली जाते हे आपल्या लक्षात येत नाही. मग वाढीव विजेचे बिल भरण्यासाठी जास्त मेहनत. हे एक दुष्ट चक्र आहे आणि या मधून बाहेर पडणे आपल्याला जवळजवळ अशक्य झाले आहे. काही वर्षांपूर्वी अशी वेळ होती की एका घरात एक टिव्ही पण नसायचा, फक्त एखादा रेडिओ असायचा पण आज एका घरात १-२ टिव्ही असतात, फ्रिज, माइक्रोवेव, १-२ ए.सी, अनेक मोबाईल फोन, प्रत्येकी एक कंप्यूटर / लॅपटॉप इत्यादी असतात. या सगळ्यामुळे आपण जास्त प्रमाणात वीज वापरत असतो. खरेच याची गरज आहे का आपल्याला ? हा प्रत्येकाचा विषय आहे.

या सगळ्या गोष्टी आपल्या जीवनाच्या अविभाज्य भाग झाल्या आहेत आणि त्यामुळे या वाढत्या पारंपारिक वीज वापराला निर्बंध घालणे हाता पलिकडे गेले आहे.

असे म्हणतात की एक पिढी तिच्या पुढच्या पिढीला काय देऊन जाते, पैसा, प्रॉपर्टी, संस्कार, इत्यादी पण आपण असाच पारंपरिक ऊर्जेचा जो काही ह्रास चालविला आहे त्यामुळे पुढच्या किंवा त्याच्या पुढच्या पिढीला पारंपरिक ऊर्जा शिल्लक देखील राहणार नाही बहुदा. यासाठी याच पिढीने योग्य पाऊले उचलली पाहिजेत. सौर ऊर्जे सारख्या अपारंपरिक उर्जास्रोताचा वापराचा पर्याय मात्र अजुन आपल्या सवयीचा झाला नाहीये.

सौर ऊर्जा ही खरेतर अक्षय ऊर्जा आहे आणि याच ऊर्जेवर संपूर्ण विश्व चालते पण आपण अजूनही याच ऊर्जेला अल्टरनेटिव एनर्जी म्हणजेच पर्यायी ऊर्जा म्हणतो. या मध्येच सगळे आले.

भारत / हिंदुस्थान हा एक विकसनशील देश आहे आणि अजूनही देशात कितीतरी भाग असे आहेत जेथे वीज (इलेक्ट्रिसिटी) काय असते हे देखील लोकांना माहिती नाहीये. आपण सधन समाजाने जर अपारंपरिक ऊर्जेचा अधिकाधिक उपयोग सुरु केला तर कमीतकमी अश्या भागांपर्यंत पारंपरिक ऊर्जा काही वर्षात पोहचू शकेल.

अक्षय ऊर्जा म्हणजेच सौर ऊर्जा ही उत्पन्न करणे अगदी सोपे आणि सरळ आहे. आपल्या भागातील प्रत्येक इमारतीने ठरविले तर सौर ऊर्जेची निर्मिती आणि उपयोग करणे सहज शक्य आहे. आपल्या निवासाची इमारत, आपली सोसायटी यामध्ये लिफ्ट, कार लिफ्ट, पाण्याचे पंप, इमारतीतील सगळे दिवे, गच्चीवरचे दिवे, कंपाउंड चे दिवे, cctv कॅमेरे, इत्यादी सुविधा असतात

या सर्व सुविधांना विज लागतेच. प्रत्येक इमारतीने ठरविले की या सगळ्या सुविधांसाठी सौर ऊर्जेचा उपयोग करायचा तर ते सहज शक्य आहे. आपल्या पारल्यात अनेक इमारतींनी सौर ऊर्जा उत्पादन यंत्रणा बसवून घेतली आहे आणि त्यांना वर्षानुवर्षे त्याचा उपयोग होत आहे. टाटा पॉवर, अदानी एनर्जी ला वर्षानुवर्षे हजारों रुपये देण्यापेक्षा जेवढं होईल तेवढं विजेचे उत्पादन आपण स्वत: केले तर जास्त योग्य नाही का ? टाटा पॉवर असो किंवा अदानी एनर्जी असो त्यांचे विजेचे दर, प्रत्येक वर्षी वाढत जातात पण सौर ऊर्जेची यंत्रणा जर आपण बसवून घेतली तर आपल्याला त्याची तितकी झळ बसणार नाही.

सौर ऊर्जेचे उत्पादन करणारी यंत्रणा ही काही ही अडचण न येता कमीतकमी २५ वर्षे अगदी उत्तम चालते.

उदा. टाटा पॉवर चे एक कोष्टक दिले आहे समजण्याकरिता या कोष्टकामध्ये आपल्याला

**ELECTRICITY TARIFF SCHEDULE w.e.f 01.04.2022**

| LT I (B) :LT-RESIDENTIAL | Energy Charges (₹/kwh) | RA Charges (₹/kwh) | CSS Charges (₹/kwh) | Wheeling Charges (₹/kwh) | Fixed/ Demand Charges(₹) | ED % | TOSE (₹/kwh) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 000-100 Units | 1.70 | 0.00 | 0.00 | 1.79 | 145.00 | 16.00 | 0.2604 |
| 101-300 Units | 4.25 | 0.00 | 0.00 | 1.79 | 145.00 | 16.00 | 0.2604 |
| 301-500 Units | 7.70 | 0.00 | 0.00 | 1.79 | 145.00 | 16.00 | 0.2604 |
| Above 500 | 8.40 | 0.00 | 0.00 | 1.79 | 145.00 | 16.00 | 0.2604 |

1) Residential (3 Phase) : Addl. Fixed charges of 145/10 kW or part thereof above 10kW shall be payable. 2) Electricity Duty as per G.O.M Notification No. ELD 2016/CR 252/ENERGY-1 of 31.10.16. 3) Tax on Sale of electricity as per G.O.M Notification No. VVK-2018/CR-181/Energy-1 of 26-12-18.

प्रत्येक विजेच्या यूनिट चे दर दिसतात. हे दर प्रत्येक वर्षी वाढत जातात. पुढील २५ वर्षांचा हिशेब लावला तर किती होतील याचा अंदाज आपण लावू शकतो. सौर ऊर्जेची यंत्रणा जर आपण आपल्या इमारतीकरिता बसवून घेतली तर या वाढीची झळ बसणे आपण बऱ्याच प्रमाणात टाळू शकतो.

अगदी ढोबळ गणित करायचे झाले तर सौर

पान ९ वर


## विवाह मंडळ विलेपार्ले

हिंदु संस्कार समितीचा
गेली ५८ वर्षे चालू असलेला उपक्रम.
सर्व प्रकारांतील - वय, शिक्षण, जात, परदेशांतील घटस्फोटीत स्थळे. दर रविवारी सकाळी १०.३० ते १२.३० सप्टेंबर (पहिला रविवार ) ते जून (शेवटचा रविवार) वार्षिक वर्गणी - रु.५००/- फक्त

**स्थळ :** उत्कर्ष मंडळ हॉल, मालविय रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७.

**संपर्क:** ९८३३३७१८७३

## साजिरी

हसत रहा साजिरी संगे सजत रहा !!

पार्ला म्हणजे संस्कृतीची खाण
साजिरी पुरवते साड्यांचे वाण



पैठणी
माहेश्वरी
चंदेरी
खण
इरकल
नारायणपेठ

अ-01 सुवास अपर्टमेंट हनुमान रोड, मॅकडोनल्ड जवळ
विलेपार्ले (पूर्व) मुंबई :- 400057
9867088877 / 9136405267

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी पालकांचा प्रयत्न

रमाबाई परांजपे बालमंदिरची गल्ली, त्याला समांतर असलेली गल्ली आणि पार्ले टिळक आयसीएसईची गल्ली अशा या तीन गल्ल्यांच्या सुरवातीला वाहनांसाठी 'नो एंट्री' असा बोर्ड लावलेला आहे. तरीसुद्धा अनेक वाहनांची वरदळ सतत या गल्ल्यांमधे होत असते. दुपारच्या आणि संध्याकाळच्या वेळेत पालक ,विद्यार्थी आणि वाहनं अशी गर्दी जमते आणि त्यामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण होते. म्हणून मी आणि माझ्याबरोबर आणखी दोन पालक (नितांत चासकर आणि विनायक माने) या गल्ल्यांमधे शाळा सुटण्याच्या वेळेत उभे राहून नो एंट्री मध्ये शिरणाऱ्या वाहनांना थांबवण्याचा गेली ७-८ वर्षे प्रयत्न करत आहेत. कधी वाहन चालक नम्रपणे निघून जातात, काही वेळा कौतुकाची थाप मिळते तर कधी अर्वाच शिवीगाळ होतात तर कधी - कधी धमक्याही मिळतात. आम्ही वाहतूक पोलीस अधिकाऱ्यांना 'या गल्ल्यांमध्ये कॅमेरे बसवावेत नाहीतर दोन वाहतूक पोलीस रोज दुपारी दीड तास आणि संध्याकाळी दीड तास पाठवावेत जेणेकरून कायदा तोडणाऱ्या लोकांना वचक बसेल' अशा विनंत्या केल्या आहेत पण आजतागायत पाहिजे तशी मदत आम्हाला मिळाली नाही. आम्ही पालक आशा करतो की विलेपार्ले पूर्व येथील लोकप्रतिनिधी आणि विलेपार्ले पोलीस स्टेशन व वाकोला वाहतूक कक्ष या समस्येवर काहीतरी कायमस्वरूपी तोडगा काढतील.







अर्चिस भिडे
९६१९६ ८९१६९

# प्रा. श्री पु. भागवत यांना अद्वितीय आदरांजली

'सत्यकथा'आणि 'मौज' या प्रकाशनांचे साक्षेपी संपादक, सर्वोत्तम प्राध्यापक, मराठीतील ज्येष्ठ- श्रेष्ठ कवी- कथाकार-




कादंबरीकार यांना मराठी साहित्यविश्वात चिरस्मरणीय कामगिरी करण्याची प्रेरणा देणारे प्रा. श्री पु. भागवत यांची २१ ऑगस्ट रोजी सोळावी पुण्यतिथी होती . या निमित्ताने 'मौज प्रकाशना' तर्फे 'शब्द शब्द वेचिता...' हा काव्यवाचनाचा कार्यक्रम २१ ऑगस्ट रोजी साठये कॉलेजच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमादरम्यान श्री पु. भागवत यांनी प्रकाशित केलेल्या सत्यकथेतील कवितांच्या उच्चारणाने आदरांजली वाहिली गेली. मौज ने १९४७ ते १९८२ या पस्तीस वर्षांत सत्यकथेतून प्रकाशित झालेल्या साधारण साडेतीन हजार कवितांतून निवडलेल्या तब्बल अकराशे कविता सामावून घेणारे दोन खंड काव्यरसिकांच्या हाती दिले. त्याच दोन खंडांमधून निवडलेल्या काही खास कविता मराठी रंगभूमी, मालिका, चित्रपट, रेडिओ, जाहिरातक्षेत्र, चित्रपटनिर्मिती, संवादलेखन अशा अनेक माध्यमांमधून सातत्याने अप्रतिम काम करणारे आणि कवितेवर निस्सीम प्रेम करणारे सन्माननीय अजित भुरे, आनंद इंगळे, मुग्धा गोडबोले, स्पृहा जोशी आणि हरहुन्नरी गायक डॉ. सत्यजित कोसंबी आणि डॉ. शाब्दा तापस यांनी सादर केल्या. या कार्यक्रमाचे संकल्पक आणि मौज प्रकाशनाचे प्रमुख श्री श्रीकांत भागवत यांनी मंचावरील सर्व कलावंतांचं स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री विजय तापस ह्यांनी केले. काव्यरसिकांचा ह्या कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद होता .

# अरविंद मुखेडकर यांच्याकडून मुकेश यांना स्वरनैवद्य

हिंदी फिल्मी म्युझिकच्या सुवर्णकाळातील सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकांपैकी व मान्यवर मानल्या जाणाऱ्या श्रेष्ठ पार्श्वगायक मुकेश यांचे जन्मशताब्दी चे वर्ष सुरू आहे. पार्ल्यातील सुपरिचित म्युझिक कंपोजर, अरेंजर, म्युझिकॉलॉजिस्ट,





गायक श्री. अरविंद मुखेडकर यांनी मुकेश जन्मशताब्दी निमित्त 'हमारे मुकेश' हा दिवाळी पहाट कार्यक्रम २४ ऑक्टोबर रोजी प्र. ठाकरे क्रीडा संकुल येथे सादर केला होता. या कार्यक्रमाच्या यशानंतर मुंबई, पुणे (राजकपूर समाधी स्थळी), खंडाळा, नाशिक आदी ठिकाणी याचे सुमारे बारा कार्यक्रम केल्यानंतर नुकताच त्यांचा 'मुकेश १०१' हा कार्यक्रम मुंबईच्या नौशाद संगीत समितीने आयोजित केला होता. या कार्यक्रमात अरविंद यांनी मुकेश यांची १०१ विविध मूडची गाणी गाऊन हा प्रयोग यशस्वी केला. संगीत देवतेला वाहिलेला हा त्यांचा १०१ गीतांचा स्वरनैवेद्यच होता. मुकेश यांची गाणी ऐकायला त्यांना सर्वत्र दर्दी व समजून ऐकणारा श्रोतृवर्ग मिळत गेला. लवकरच अरविंद मुखेडकर 'मुकेश एक, सितारे अनेक' ही संहिता घेऊन येत आहेत. त्याचाही आरंभ ते पार्ल्यातूनच करणार आहेत.

# विश्वभरारी फाउंडेशन आणि साठ्ये महाविद्यालयातर्फे ना. धो. महानोर यांना अनोखी आदरांजली



मातीचा गंध गीतांतून देणारे ज्येष्ठ कवी, गीतकार ना. धों. महानोर ३ ऑगस्ट रोजी काळाच्या पडद्याआड गेले आणि सर्वत्र शोककळा पसरली. साहित्य क्षेत्रातील जेष्ठ कवी ना. धों. महानोर यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी १२ ऑगस्ट रोजी विश्वभरारी फाउंडेशन आणि साठ्ये महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रानकवी ना. धो. महानोर यांच्या साहित्यावर आधारित 'महानोरांचे साहित्य संचित' या आदरांजलीच्या कार्यक्रमाचे आयोजन साठ्ये महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमात ना.धो. महानोर यांच्या साहित्यावर आधारित गाणी, कविता, आठवणी आणि साहित्यिक योगदानाचे विवेचन असा भरगच्च कार्यक्रम सादर झाला.

विश्वभरारी फाउंडेशनच्या संस्थापिका लता गुठे व संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमामध्ये साठ्ये कॉलेज मराठी विभागाचे मोठे सहकार्य लाभले. पॉप्युलर प्रकाशनाचे रामदास भटकळ यांनी महानोर यांच्या अनेक आठवणी सांगून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलू उलगडून दाखविले, कवी अरुण म्हात्रे यांनी महानोर यांची सुप्रसिद्ध गाणी सादर करून महानोरांच्या काव्यांची वैशिष्ट्ये सांगितली. प्राचार्य डॉ. माधव राजवाडे यांनी साठ्ये कॉलेजच्या वतीने प्रास्ताविक केले. प्राध्यापक समीर जाधव यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रसिद्ध संगीतकार कौशल इनामदार यांनी अजंठा चित्रपटातील गाणी, किस्से याचबरोबर महानोर यांच्या भेटीगाठीतील संवाद आणि आठवणी सांगितल्या. प्रसिद्ध दिग्दर्शक अभिजित पानसे यांनी त्यांच्या खुमासदार शैलीत महानोर यांच्या गाण्यांची काही वैशिष्ट्ये अधोरेखित केली. या सर्व मान्यवरांच्या सहभागाने आणि संदीप राऊत, सुवर्णा घैसास, स्मुग्धा माळी अशा गायक वृंदाने सादर केलेल्या महानोरांच्या गाण्याने एकूण कविवर्यांचे स्मरण आणि त्यांना वाहिलेली आदरांजली अनोखी ठरली. साठ्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी संगीत संयोजन केले. डॉ. कृष्णा नाईक, प्रकाश राणे, गुरुनाथ तेंडुलकर, प्रशांत राऊत, अशोक शिंदे, संपदा पाडगावकर तसेच विविध क्षेत्रातून अनेक मान्यवरांनी या कार्यक्रमाला उत्तम दाद दिली. मोठ्या संख्येने कॉलेजचे विद्यार्थीही कार्यक्रमाला उपस्थित होते. 'ना. धो. महानोर यांच्या शब्दांचे ऋण माझ्यावर आहेत. त्याची परतफेड तर नाही करता येणार परंतु, त्यांना आदरांजली म्हणून त्यांच्या कविता, गाणी इतरांपर्यंत पोहोचवण्याचा एक छोटासा प्रयत्न करणे हे मी माझे कर्तव्य समजते.' असे लता गुठे यांनी मनोगतातून व्यक्त केले, आणि सर्वांचे आभार मानले.



# विसरलेले समाज - ५ : अक्रोटीरी

देशोदेशी

आजच्या पाश्चिमात्य संस्कृतीच्या शास्त्र, तत्वज्ञान, राजकीय/सामाजिक विचार (धर्माव्यतिरिक्त इतर), कला, वाङ्मय, स्थापत्य अश्या सर्व अंगांचा उगम प्राचीन ग्रीक संस्कृती पासून झाला असं मानलं जातं. त्यामुळे ही प्राचीन ग्रीक संस्कृती कधी विसरली गेली नाही. अर्थात 'प्राचीन ग्रीक समाज' म्हणजे - मायसिनी, अथेन्स, स्पार्टा, कॉरिंथ, अशी नगर-राज्यं, किंवा झूस, अथेना, पोसायडॉन, अपोलो अश्या देवांची देवळं किंवा प्लेटो, सॉक्रेटिस, ॲरिस्टोटल, अनॅक्सिमांडर असे तत्वज्ञ/शास्त्रज्ञ, अथवा होमर, युरिपिडस, सोफोक्लीस असे लेखक असंच चित्र आपल्या डोळ्यासमोर येतं. माझ्याही मनात 'प्राचीन ग्रीस'चं हेच रूप होतं.

मी ग्रीसची वारी दोन मुख्य कारणांसाठी केली होती -

१. ग्रीसच्या प्राचीन इतिहासाच्या पाऊलखुणा असलेली ठिकाणं - अक्रोपोलीस आणि पार्थेनॉन, ऑलिंपिया, डेल्फी, कॉरिंथ इत्यादी स्वत:च्या डोळ्याने पाहावी आणि

२. एजियन समुद्रातील छोट्या छोट्या बेटांसभोवतालची (Cyclades) अप्रतिम निसर्गशोभा अनुभवावी.

मात्र त्यातील सँटोरिनी सारख्या स्वर्गीय निसर्गसौन्दर्यानिने नटलेल्या बेटावर अक्रोटीरी गावानजीक, ह्या आठवणीतल्या 'प्राचीन' ग्रीक समाजापेक्षाही पुरातन परंतु हजारो वर्षे पूर्णपणे विस्मृतीच्या पडद्याआड गेलेल्या कोणा वेगळ्याच संस्कृतीचे अवशेषही पाहायला मिळतील असं मुळीच अपेक्षित नव्हतं. ह्या वाक्यातील 'वेगळ्याच' हा महत्वाचा शब्द आहे. सँटोरिनी बेटावर जे अवशेष मिळाले ते आपल्या परिचयाच्या जुन्या ग्रीक समाजाच्या अवशेषांपेक्षा फक्त अधिक पुरातन असते तर केवळ त्याचं फारसं नवल वाटलं नसतं.

नवलाईची बाब ही आहे की ते अवशेष एका भिन्न प्रकृतीच्या समाजाचे निदर्शक आहेत - त्यांच्या कलाकृती, नगर रचना आणि त्यातून दिसणारी त्यांची जीवनशैली अशा सर्वच बाबतीत त्यांचा वेगळेपणा दिसतो. उदाहरणार्थ, अथेन्स मधील पार्थेनॉन **(पहा पहिला फोटो)**,




किंवा एकूणच त्या काळातील ग्रीक जगातील भव्य इमारती, देवळं, संगमरवरी शिल्प, हजारो प्रेक्षक बसू शकतील अशी ॲंफिथिएटर्स **(दुसरा फोटो)** अश्या प्रकारचं काहीही ह्या



अक्रोटीरीच्या उत्खननात दिसत नाही. आणि आपल्याला परिचित ग्रीक स्थापत्यशैलीशी (पहिल्या फोटोतील पार्थेनॉन हे त्याचं सर्वात प्रसिद्ध उदाहरण) साधर्म्य दाखविणारही काही बांधकामही आढळत नाही.

दुसऱ्या बाजूला, अक्रोटीरीच्या भग्नावशेषांत जी भित्तिचित्रं (Frescos) सापडली **(पहा तिसरा आणि चौथा फोटो)**, त्यांच्याशी दुरान्वयानेही साम्य असणारी







चित्रकलेची शैली आपल्या परिचयाच्या प्राचीन ग्रीक जगात दिसत नाही. खरंतर ही भित्तिचित्रं हेच ह्या समाजाचं व्यवच्छेदक लक्षण आहे असं मला वाटतं. अक्रोटीरीच्या उत्खननात सापडलेल्या बहुसंख्य इमारतींच्या भिंती (ज्या काळाचे चपेटे खाऊनही न पडता उभ्या होत्या तेव्हढ्यातरी) अश्या बहुरंगी चित्रांनी संपूर्ण सजविलेल्या होत्या **(पहा मिळालेल्या अवशेषांवरून जीर्णोद्धार केलेल्या एका सामान्य घरातील ३ भिंतींचा पाचवा फोटो)**. ह्या थक्क करणाऱ्या चित्रकारितेत, त्यातील



बारकावे, रंगसंगती आणि रेखाटन शैली पाहता, ग्रीक समाजापेक्षा ख्रिस्तपूर्व पंधरा-सोळाव्या शतकात क्रीट बेटावर बहरलेल्या मिनोवन (Minoan) संस्कृतीच्या कलेशी अधिक साधर्म्य दिसतं. तसंच त्या काळात क्रीटमध्ये वापरल्या जाणाऱ्या Linear A ह्या लिपीत लिहिलेलं असावं असं वाटणारं लिखाणही उत्खननात मिळालेल्या काही तुरळक वस्तूंवर आढळलं. ह्या लिपीची फोड अजून कोणालाही करता न आल्या मुळे ह्या लिखाणात नक्की काय नोंदलेलं आहे ते मात्र सांगता येत नाही.

अक्रोटीरीचं उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे अशी उत्कृष्ट कला फक्त समाजातील उच्चभ्रु वर्गाची मक्तेदारी होती असं दिसत नाही. जशी ती एखाद्या अनेक मजली (आणि म्हणून बहुधा श्रीमंत किंवा समाजातील वजनदार व्यक्तीच्या मालकीच्या) घरात आढळते तशीच आणि तेवढ्याच गुणवत्तेची, एखाद्या सामान्य घराच्या भिंतींवरही दिसते किंवा धान्य साठविण्याच्या एखाद्या कोठीच्या खोलीतही मिळते.

पण ह्या कलाकृतीं एव्हढीच वैशिष्ट्यपूर्ण आहे अक्रोटीरीची स्थापत्य-शैली आणि नगर-रचना. चिकणमातीच्या नळांमधून घर-घरात खेळवलेलं पाणी आणि मलनि:स्सारणाची व्यवस्था एखाद्या आधुनिक शहरासारखी होती. जमिनीच्या नैसर्गिक चढाव-उतारांचा उपयोग करून शहरातील मैला दूरवर समुद्रात सोडला जात होता. घर-घरात येणाऱ्या पिण्याच्या पाण्याचा उगम नक्की कुठे होता हे जरी आज ज्ञात नसलं तरी बहुतेक आज ज्याला प्रोफिटिस इलियासचा डोंगर (Prophet Elijah) म्हणतात तेथून बांधलेल्या जलवाहिनीमधून ते गावपर्यंत आणलं असावं. गावातल्या प्रत्येक घरात खेळतं पाणी, स्नानगृह आणि शौचालय आणि मलनि:स्सारण थेट शहराबाहेर समुद्रात - अशी यंत्रणा अगदी ३००० वर्षांनंतर ख्रिस्तोत्तर १७-१८ व्या शतकातील श्रीमंत आणि जगभर आपली साम्राज्यं पसरविणाऱ्या युरोपमध्ये सुद्धा सर्वसामान्य लोकांच्या घरात अभावानेच दिसते!

गावातील बरीच घरं दोन किंवा तीन मजली सुद्धा असावी. घरं सर्वसामान्यपणे आयताकृती नेमके कापलेले आणि समान आकाराचे दगड काटकोनात चुन्यामध्ये बसवून बांधलेली होती (ह्या प्रकारच्या बांधकामाला Ashlar Masonry म्हणतात). अश्याच प्रकारची स्थापत्य-शैली क्रीट बेटावरील प्राचीन मिनोवन समाजातही दिसते. **(पहा सहावा आणि सातवा फोटो)**

त्यामुळे (चित्रकला, स्थापत्य-शैली आणि





लिखाण ह्यातील साधर्म्य) आणि एकूणच अक्रोटीरी मध्ये सापडलेल्या इतर वस्तूंवरून एक निष्कर्ष असा निघतो की अक्रोटीरीचा हा समाज क्रीट मधील मिनोवन साम्राज्यांतीलच एक भाग होता. मात्र मिनोवन संस्कृतीचा कालखंड होता साधारण ख्रिस्तपूर्व २००० ते १२००. परंतु अक्रोटीरीच्या संस्कृतीचा उगम त्याहीपेक्षा किमान २००० वर्षे तरी आधीच झाला होता असं उपलब्ध पुराव्यांवरून दिसतं.

उत्खननात सापडलेल्या वस्तू, भित्तिचित्रांत रेखाटलेले समाज-जीवनातील प्रसंग, त्यातील व्यक्तींच्या अंगावरचे कपडे/आभूषणे, अगदी सामान्य घरातही दिसणाऱ्या सुखसोयी अश्या कुठल्याही निकषांवर पाहिलं तरी अक्रोटीरी हे श्रीमंत, समृद्ध शहर होतं. त्यांचे व्यापारी संबंध केवळ क्रीटचे मिनोवन साम्राज्य किंवा ग्रीस मधले मायसेनियन (म्हणजेच आपल्या परिचयाची प्राचीन ग्रीक संस्कृती) एव्हढेच मर्यादित नव्हते. तर भूमध्य सागराच्या पूर्व टोकावरील इजिप्शीयन किंवा त्याही पलीकडील पश्चिम आणि मध्य आशियातील समाजांबरोबरही त्यांचे व्यापारी (आणि कदाचित सांस्कृतिक सुद्धा) संबंध असावे असं अक्रोटीरीच्या अवशेषांत सापडलेल्या वस्तू (भांडी-कुंडी, हस्तिदंत, शहामृगाची पिसं, शिक्के) पाहता म्हणता येईल.

अश्या ह्या समृद्ध नगरीचा अंत ख्रिस्तपूर्व १७ व्या शतकात अगदी तडका फडकी झाला. ख्रिस्तपूर्व सुमारे १६५० मध्ये थेरा म्हणजेच आजच्या सँटोरिनी बेटावरील ज्वालामुखीच्या उद्रेकात अक्रोटीरीचा संपूर्ण विनाश झाला. मात्र एक उपपत्ती अशीही आहे की थेराचा विस्फोट होण्याआधीच सुमारे एक शतकापूर्वी अक्रोटीरीचं मूळ (म्हणजे ख्रिस्तपूर्व ४००० पासून उभं असलेलं) नगर एका प्रचंड भूकंपात नष्ट झालं. आणि त्यानंतर बहुधा क्रीट बेटावरील लोकांनी ह्या उध्वस्त नगरीच्याच पायावर नवीन समृद्ध शहर उभारलं. अक्रोटीरीमध्ये जागो-जागी दिसणाऱ्या मिनोवन संस्कृतीच्या प्रभावाचं कदाचित हे कारण असू शकेल.

थेराच्या ह्या ज्वालामुखीचा उद्रेक किती प्रलयंकारी होता त्याची थोडीशी कल्पना देणारे हे काही आकडे - गेल्या १०००० वर्षांत झालेल्या सर्व ज्वालामुखीच्या विस्फोटांपेक्षा हा मोठा होता. ज्या व्हेसुव्हियसच्या उद्रेकातून निघालेल्या राखेत पॉम्पे गाडलं गेलं असं मी मागच्या लेखात म्हटलं होतं, त्या व्हेसुव्हियस मधून फक्त ६ घन कि.मी. राख बाहेर फेकली गेली होती. थेराच्या विस्फोटातून ६० घन कि.मी. म्हणजे दसपट जास्त राख फेकली गेली. थेरा सभोवतालच्या २० कि.मी. त्रिज्येच्या वर्तुळात ६० ते ८० मीटर उंच राखेचा थर जमला. ३०००० वर्ग कि.मी. क्षेत्रफळाच्या परिसरावर रात्रीसारखी अंधारी पसरली. थेरा मधून फेकली गेलेली राख आणि प्युमिस दगडाची भुकटी भूरचनाशास्त्रज्ञांना (Geologist) ब्लॅक सी किंवा आफ्रिकेतील नाईल नदीचं खोरं येथपर्यंत आढळली आहे. ह्या उद्रेकात प्राचीन थेरा बेट जवळजवळ संपूर्ण सभोवतालच्या समुद्रात नष्ट झालं. केवळ त्याच्या ज्वालामुखीचं मुख आणि त्याभोवतालचा खडकाळ भाग म्हणजे आजचं सँटोरिनी बेट शिल्लक राहिलं **(पहा सँटोरिनीचा हा आठवा फोटो - विमानातून काढलेला. त्यात थेराच्या ज्वालामुखीचं वर्तुळाकार मुख स्पष्ट दिसतं.**

एव्हढ्या प्रलयानंतर अर्थात पॉम्पे सारखंच



अक्रोटीरी पूर्णपणे राखेखाली झाकलं गेलं आणि लोकांच्या स्मृतीतून संपूर्णपणे नाहीसं झालं.

पान ९ वर

पान ८ वरून

### विसरलेले समाज - ५ : अक्रोटीरी

अक्रोटीरीला पुन्हा सूर्यदर्शन घडायला जवळ जवळ ३५०० वर्षं प्रतीक्षा करावी लागली. १८६६ साली सुएझचा कालवा बांधला जात होता. त्या काळात कालव्याच्या भिंतींना गिलावा करण्यासाठी सर्वात उत्तम माती म्हणून ज्वालामुखीतून फेकली गेलेली माती वापरत. सँटोरिनी वर अशी माती मुबलक असल्यामुळे फ्रेंच इंजिनियरची एक टोळी ही माती नेण्यासाठी तिथे पोचली. माती खणताना त्यांना ह्या अज्ञात आणि अद्भुत संस्कृतीचा अचानक शोध लागला.

मात्र अक्रोटीरीची कित्येक रहस्यं आजतागायत गुलदस्तातच राहिलेली आहेत. उदाहरणार्थ,

१. ह्या खंडहरात एकही माणूस किंवा पाळीव प्राण्याचे अवशेष अथवा कुठल्याही




मौल्यवान वस्तू (जशा पॉम्पे मध्ये सापडल्या) सापडलेल्या नाहीत. अर्थातच येथील नागरिकांना ज्वलामुखीच्या स्फोटाची पूर्व-सूचना मिळालेली असणार (कदाचित मोठे-मोठे भूकंप त्याआधीच्या काही दिवसात झाले असतील). आणि त्यांनी आपापलं चंबूगवाळं गोळा करून तिथून पळ काढला असणार. मात्र तिथून पळून ते गेले तरी कुठे? क्रीटला? पण क्रीटही ह्या विस्फोटामुळे निर्माण झालेल्या त्सुनामीखाली वाहून गेलं होतं. ग्रीस मधील मायसीनी राज्याच्या आश्रयाला? की त्याही पलीकडे भूमध्य समुद्राच्या पूर्व किंवा पश्चिम टोकाला?

२. उर्वरित अवशेषांमध्ये 'धार्मिक' म्हणता येईल असे कसलेही अवशेष - पुतळे, भित्तीचित्रं, देवालय असावं असं वाटणाऱ्या इमारती, धार्मिक विधींसाठी वापरल्या जातील असं वाटावं अशी भांडी-कुंडी - असं काहीही मिळालेलं नाही. एक स्मशानभूमी मिळाली पण तेथील कबरी मध्येही ह्याबाबत फारसा बोध होईल असं काही मिळालं नाही.

३. ते काय भाषा बोलत होते ते ही नक्की ठरविता येत नाही. आधी म्हटल्या प्रमाणे जरी मिनोवन समाजात वापरली जाणाऱ्या Linear A लिपीतले शिलालेख जरी सापडले असले तरी ते क्रीटवरून तेथे आणले गेले की स्थानिक लोकं हीच भाषा वापरात होते ते खात्रीने सांगता येत नाही. आणि ह्या लिपीचा उगम ख्रिस्तपूर्व १८५० च्या सुमारास झाला असं समजण्यात येतं. अक्रोटीरी मात्र त्याआधी किमान २००० वर्ष अस्तित्वात होतं - मग ते काय भाषा Linear A च्या आधी वापरात होते?

उत्तरं काही असोत - अक्रोटीरी एक चित्तथरारकक अनुभव होता हे मात्र खरं.



सतीश जोशी
९८२०२२८२७९

पान ६ वरून

ऊर्जेचे उत्पादन आपल्याला कमीतकमी पुढील २५ वर्षे वीज निर्मिती चा दर जास्तीत-जास्त रु.३-३.५०/- प्रति युनिट इतकाच येऊ शकतो. या मध्ये पुढील २५ वर्षात वाढ होणार नसते.

दुसरी महत्त्वाची बाब, जर आपण सौर ऊर्जेची यंत्रणा बसवून स्वत: सौर ऊर्जेतून विज निर्मिती केली आणि आपल्या सामान्य सुविधांसाठी उपयोग केला तर आपला अदानी एनर्जी किंवा टाटा पॉवर चे वापरले जाणारे विजेचे यूनिट्स कमी होतात आणि त्यामुळे पर्यायाने आपले संपूर्ण बिल कमी होण्यास मदत होते.

सौर ऊर्जेतून उत्पन्न केली गेलेली वीज पारंपरिक विजेसारखीच असते आणि त्यामुळे आपली सगळी संयंत्र त्यावर चालू शकतात.

इमारतीसाठी जेंव्हा आपण सौर उर्जेची यंत्रणा बसवून घेतो त्यावेळी आपण आपल्या पारंपारिक वीज देयकाबरोबर 'नेट मीटरिंग' करुन घेतो. नेट मीटरिंग मुळे आपण जी वीज उत्पादन करतो ती विज आपण वापरून उरलेली विज देयकाला एक्सपोर्ट करतो आणि त्याचे क्रेडिट आपल्याला पुढील महिन्याच्या बिलामध्ये मिळते. हे क्रेडिट प्रत्येक वर्षीच्या ३१ मार्च रोजी नेट जीरो होते.

आपल्या सोसायटी चे कॉमन मीटर बदलून त्या ठिकाणी द्विदिशात्मक मीटर बसविले जातात जेणेकरून आपण सौर ऊर्जेचे उत्पादन किती करतो आहोत आणि पारंपारिक वीज देयकाकडून किती वीज घेतो हे दिसून येते.

आपण आपल्या गरजेपेक्षा विज जास्त निर्माण केली तर आपल्याला पुढील बिल मध्ये क्रेडिट मिळते. आपण आपल्या गरजेपेक्षा कमी उत्पन्न

### अपारंपरिक उर्जेची परंपरा

केल्यास पारंपारिक वीज देयकाकडून विज घेतल्याचे बिल आपल्याला भरावे लागते. द्विदिशात्मक (नेट) मीटर याची मोजणी करतो.

०१ एप्रिल २०२३ पासून सौर ऊर्जेची यंत्रणा बसविल्यास सोसायटी ला प्रॉपर्टी टॅक्स मध्ये ५% सुट मिळण्याची शक्यता आहे.

आम्ही पार्लेकर च्या माध्यमातून समस्त पार्लेकरांना हे सांगू इच्छितो की सौर ऊर्जेचा उपयोग करुन आपल्या पारल्याला मॉडेल टाऊन नक्कीच करू शकतो आणि आपले निसर्गाचे आणि समाजाचे देणे देऊ शकतो. आपण एक उदाहरण सगळ्यांसमोर ठेऊ शकतो.

आम्ही पार्लेकर मार्फत आपण अपारंपारिक ऊर्जा वापरण्याची एक नवीन परंपरा सुरू करू शकतो.

डॉ. गोंधळेकर हे एका दशकापेक्षा जास्त काळ या अपारंपरिक ऊर्जा उत्पादन, ऊर्जा संवर्धन आणि ऊर्जा कार्यक्षमता व्यवस्थापन या विषयांवर काम करीत आहेत.

डॉ. गोंधळेकर या विषयांवर वेगवेगळ्या संस्थांमधून आणि संस्थांमध्ये व्याख्याने (लेक्चर्स) घेतात. CII (कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज) सारख्या संस्था त्यांना मार्गदर्शक म्हणून व्याख्यानांसाठी बोलावितात. भारतातील अनेक संस्थांना डॉ. गोंधळेकर अपारंपरिक ऊर्जा उत्पादन, ऊर्जा संवर्धन आणि ऊर्जा कार्यक्षमता व्यवस्थापन या विषयांवर मार्गदर्शन करतात. त्यांच्या या क्षेत्रात अनेक उपलब्धी आहेत. या क्षेत्रात त्यांनी बरेच नवनवीन प्रयोग करुन अनेक शोध लावले आहेत आणि त्यामुळे भारतात आणि भारताच्या बाहेर अनेक संस्थाना किती तरी उर्जा रोज वाचवता येते आहे. त्यांच्या या अविरत कार्यासाठी आणि योगदानासाठी त्यांना 'भारत अभिमान पुरस्कार' मिळाला आहे.

या वर्षी २५ मार्च २०२३ रोजी त्यांना यासाठी अमेरिकन काउन्सिल फॉर ट्रेनिंग एंड डेवलपमेंट, न्यू जर्सी, USA, इंस्टिट्यूट ऑफ एंट्रप्रेनरशिप एंड मैनेजमेंट, मिनिस्ट्री ऑफ स्मॉल एंड मीडियम एंटरप्राईजेस (MSME), आणि नीति आयोग दर्पण (भारत सरकार) कडून 'मानद डॉक्टरेट'(honoris causa) - Honorary Doctorate in Business Management and Technology प्रदान करण्यात आली आहे. त्याचबरोबर

श्री. मंगल प्रभात लोढा, श्रीमती. उषा ताई मंगेशकर, श्री. राज पुरोहित, श्री. बिट्टा या मान्यवरांकडून डॉक्टर कौस्तुभ द्वारकनाथ गोंधळेकर यांचा गौरव यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, येथे करण्यात आला.



डॉ. कौस्तुभ द्वारकनाथ गोंधळेकर
९९२०४६८८८४

## पार्ल्यातील वृक्षवैविध्य

# मोठा करमळ / Dillenia indica

आपला ह्यावेळचा वृक्ष आहे मोठा करमळ Dillenia indica Family Dilleniaceae पश्चिम घाट क्षेत्रात व भारतात करमळाच्या बऱ्याच जाती आढळतात. त्यातील अत्यंत देखणी पाने व फुले असणारा असा हा वृक्ष आहे मोठा करमळ. भरपूर पाऊस पडणाऱ्या प्रदेशात आढळणारा हा मध्यम आकाराचा वृक्ष आहे. पानांवरील खोल असणाऱ्या शीरा व दातेरी कडांमुळे काहीशी लांबट असणारी ह्याची गर्द हिरवी पाने खूप शोभिवंत दिसतात. (CORRUGATED LEAVES) व म्हणूनच बागांमधे व क्वचित रस्त्याच्या कडेला हा शोभेचा वृक्ष म्हणून लावला जातो.

पार्लेटिळक विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या मैदानाच्या कडेला, हनुमान रस्त्याच्या बाजूला असलेला हा वृक्ष सध्या बहरत आहे.

पानांच्या खाली, कंदिलांसारख्या लटकलेल्या मोठ्या कळ्या फुलतात तेव्हा ती ७-७.५ इंच व्यासाची फुले खूपच शोभिवंत दिसतात. ही फुले व त्यानंतर धरणारी काहीशी आंबट चवीची फळे खाद्य आहेत व ती रानभाज्यांमधे गणली जातात. आसाम व इतर इशान्येकडील राज्यांमधे ह्यांचा वापर जास्त केला जातो. ह्याची फळे हे हत्ती व माकडांचे आवडते खाद्य आहे व त्यांचे जंगलातील हे खाद्य नाहीसे होऊ नये म्हणूनच ही फळे गोळा करणे व बाजारात विकणे ह्या वर बंदी आहे.

पाने, खोडावरील साल, फुले व फळे विविध देशी औषधांमधे केसातील कोंडा, संधीवात, मधुमेह, ताप वगैरेंसाठी वापरली जातात. फळातील गराचा मुरंबा देखील केला जातो. हा वृक्ष लहान असताना ह्याची पाने खूपच मोठी व अत्यंत देखणी असतात.




शोभिवंत पाने व कंदीलासारखी खाली लटकलेली फुले



श्रीकांत सावरकर
९२२३३१४९०९

## मनोरंजन विश्व

# टेरिटरी

सध्याच्या काळात अतिशय वैविध्यपूर्ण मराठी चित्रपट प्रदर्शित होत आहेत आणि या महिन्यात 'टेरिटरी' हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. विदर्भातील जंगलाच्या आणि वाघाच्या




शोधाची थरारक कहाणी 'टेरिटरी' या चित्रपटातून उलगडण्यात आली आहे. यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा येथील जंगलात नरभक्षक झालेला वाघ जंगलातून गायब होतो, या नरभक्षक वाघाला मारण्यासाठी न्यायालयाकडून परवानगी दिली जाते आणि एक थरारक शोध सुरू होतो.गेल्या काही वर्षांत विकासाच्या नावाखाली जंगलांचे प्रमाण कमी झाल्याने वाघ, बिबट्या यांच्यासारखे वन्यजीव आणि मानव यांच्यातील संघर्ष तीव्र होऊ लागला आहे. विदर्भातील जंगलाच्या टेरिटरीची अशीच थरारक कहाणी या चित्रपटातून पाहता येणार आहे.

कलकत्ता इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल, गंगटोक इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल, ग्रीन अकॅडमी अवॉर्ड्स , गोल्ड फर्न फिल्म अवॉर्ड्स अशा विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय महोत्सवांमध्ये हा चित्रपट दाखवला गेला आणि पारितोषिकप्राप्त ठरला आहे. तसेच पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल, कान्स फेस्टिवल मार्केट,मेटा फिल्म फेस्टिवल, दुबई आणि मुंबई इंडिया फिल्म फेस्टिवल येथे ही या चित्रपटाची निवड झाली होती. सचिन श्रीराम दिग्दर्शित या चित्रपटात संदीप कुलकर्णी, किशोर कदम अशी तगडी स्टारकास्ट आहे. निर्माते श्रीराम मुल्लेमवार यांच्या डिव्हाईन टच प्रॉडक्शन्सतर्फे 'टेरिटरी' हा चित्रपट प्रस्तुत करण्यात आला आहे.या चित्रपटाची कथा, संवाद आणि दिग्दर्शन सचिन श्रीराम यांचे आहे .कृष्णा सोरेन यांनी चित्रपटाचं छायांकन केलं आहे तर मयूर हरदास यांनी संकलन, महावीर सब्बनवार यांनी ध्वनि आरेखन, यश पगारे यांनी पार्श्वसंगीताची जबाबदारी निभावली आहे.

# तीन अडकून सीताराम

आपली मराठी भाषा प्रांताप्रमाणे बदलते , असं म्हटलं जातं . विविध प्रांतात मराठी भाषेत विविध वाक्यप्रचार वापरले जातात. कोल्हापूरमध्ये वापरला जाणारा एक वाक्यप्रचार म्हणजे 'तीन अडकून सीताराम'. याच शीर्षकाचा एक चित्रपट या महिन्यात प्रदर्शित होतोय. पण या वावाक्यप्रचाराचा नेमका अर्थ काय? हे चित्रपट आल्यावरच कळेल. सुप्रीम मोशन पिक्चर्स प्रा. लि. आणि नितीन वैद्य प्रोडक्शन्स प्रस्तुत 'तीन अडकून सीताराम' या चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन हृषिकेश जोशी यांनी केले असून लालासाहेब शिंदे, राजेंद्र शिंदे आणि नितीन वैद्य या चित्रपटाचे निर्माते आहेत. या चित्रपटात कोण

प्रमुख भूमिकेत दिसणार हे जाणून घेण्यासाठी मात्र थोडी प्रतीक्षा करावी लागणार आहे. दुनिया गेली तेल लावत, अशी टॅगलाईन असणारा हा चित्रपट २९ सप्टेंबर रोजी चित्रपटगृहात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपटाचे पोस्टर हे उत्कंठा वाढवणारे आहे. पोस्टरमध्ये तीन ही संख्या दर्शवणारा एक हात दिसत असून त्या हातात बेडी दिसत आहे. तर बेडीच्या दुसऱ्या बाजुला स्माईली दिसत आहे. याचा नेमका संबंध काय, याचे उत्तर चित्रपट पाहिल्यावरच मिळेल. हृषिकेश जोशी हे नेहमीच हटके विषय हाताळतात, त्यामुळे या चित्रपटातही काहीतरी भन्नाट पाहायला मिळणार हे नक्की चित्रपटाबद्दल दिग्दर्शक हृषिकेश जोशी म्हणतात, ''संपूर्ण कुटुंबासोबत पाहावा, असा हा विनोदी चित्रपट आहे. प्रत्येक वळणावर प्रेक्षकांची उत्सुकता वाढेल.''






गणेश आचवल
९८२१२६८३९१


# चिंध्या अनुबंधांच्या...!

आयुष्यात आपल्याला असंख्य माणसं भेटत असतात. त्यांच्याशी येणाऱ्या संबंधांतून आपण अनेक अनुभव घेत असतो. कितीतरी चांगल्यावाईट गोष्टी आपल्या नजरेस पडत असतात. माझा जीवनप्रवास काही याहून वेगळा नाही. हो! पण एक फरक मात्र नक्कीच आहे... निसर्गाच्या सान्निध्यात बागडायला मला आवडतं... त्यामुळं पक्ष्याप्राण्यांचे अनुभवसुद्धा मला समृद्ध करतात.

विचारशक्ती हे माणसाला मिळालेलं वरदान आहे. माझ्या निरीक्षणशक्तीतून आणि चौकस बुद्धीतून खूप प्रश्न विचारत मी लहानाचा मोठा झालो. अजूनही काही प्रश्नांची उत्तरं मला सापडलेली नाहीत पण प्रयास अखंडित सुरू आहे... राहील...!

हे पुस्तक म्हणजे मला पडलेल्या काही प्रश्नांचा, मनात आलेल्या काही विचारांचा, निसर्गाकडून शिकलेल्या लहानमोठ्या धड्यांचा, पक्ष्याप्राण्यांकडून मिळालेल्या कडूगोड शिकवणीचा आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे माझ्या भोवताली घडलेल्या निवडक गोष्टींच्या निरीक्षणांचा संग्रह आहे.

उबदार गोधडी शिवताना आपण जसे कापडाचे तुकडे गोळा करू ना... अगदी तसेच हे सारे अनुभव मी गोळा केले आहेत म्हणूनच मी त्यांना चिंध्या म्हणतो. त्यांतून शिवलेली गोधडी म्हणजे हे पुस्तक. मानवी




संबंधांच्या, नात्यांच्या पलीकडले हे संबंध म्हणून ते माझे अनुबंध आहेत.

या पुस्तकात काही गोष्टी तर काही लेख आहेत. मानवी मनात उफाळणाऱ्या भावना, त्या भावनांच्या वेगवेगळ्या छटा त्यात वाचकाला दिसतील. काही गोष्टी मजेशीर आहेत, काही स्फूर्तिदायक तर काही गंभीर प्रश्न मांडणाऱ्या आहेत.

आपण अशा प्रश्नांवर जास्त विचार करणं सहसा टाळतो. आजकालच्या धकाधकीच्या आयुष्यात एवढा विचार करायला कुणाला वेळ आहे? माणूस खूपच आत्मकेंद्रित होत चालला आहे यात दुमत असण्याचं कारण नाही. तरुण पिढीची तर बातच निराळी आहे. त्यांचा नातेसंबंधांकडे बघायचा दृष्टीकोनच वेगळा आहे.

या पुस्तकात तुम्हाला मानवी संबंधातून निर्माण होणारी गुंतागुंत वाचायला मिळेल आणि त्यातून तुम्हीही विचार करायला प्रवृत्त व्हाल अशी आशा मला आहे.

आपल्या दैनंदिन जीवनात घडणाऱ्या गोष्टींमध्ये जीवनाचं सार दडलेलं आहे म्हणून हे लेखन करायचा मनसुबा मी केला. या लेखनातून तुम्हाला माझे विचार समजतील, माझ्या भावना तुम्हाला साद घालतील, माझा स्वभावविशेष तुम्हाला समजेल. तसंच माझा नातेसंबंधाकडे बघायचा दृष्टीकोनही तुम्हाला उमगेल.

पुस्तकातली भाषा साधीसोपी आणि सरळ आहे. तुम्हाला हे पुस्तक वाचताना जड जाणार नाही. या गोष्टी तुम्हाला भावतील अशी अपेक्षा बाळगून त्या मी तुम्हाला सादर करतो आहे.

या पुस्तकाचं प्रकाशन मंगळवारी १० ऑक्टोबरला साठ्ये कॉलेज ऑडिटोरियम, दीक्षित रोड, विले पार्ले पूर्व इथे संध्याकाळी ७ वाजता होणार आहे. लोकप्रिय अभिनेते श्री. संदीप कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत तरी आपण या प्रकाशनाला नक्की या... वाट पाहतोय...!



समीर धोंड
९८४५० १९६६१

# श्रावण बाळ व कलाकारांचं स्वातंत्र्य

शाळेतील अनेक आंबट, गोड व कटू आठवणींपैकी 'श्रावणबाळाची कविता' ही आठवण यापैकी कोणत्या वर्गवारीत दाखल करावी हे मला अजूनही न सुटलेलं कोडं आहे. ग. ह. पाटील या कविची ही कविता अत्यंत करूण असूनही इतकी नितांत सुंदर आहे कि ती माझ्या मनावर बालपणापासून अगदी कोरली गेली आहे. 'शर आला तो धावून आला काळ, विव्हळला श्रावण बाळ....' ते शब्द, ती काळजाला हात घालणारी चाल. ती मला शाळेत शिकायला मिळाली यासारखा गोड प्रकार दुसरा नाही.



अजूनही ही कविता कानावर आली कि कवितेच्या पानावरील ते श्रावण बाळाचे चित्र मन: चक्षुन समोर उभं राहतं. आमच्याच शालेय वयाचा तो गोड, नाजूक १४/१५ वर्षाचा बाळ. कुरळे केस, बोलके डोळे व भावपूर्ण चेहरा. पण काही वर्षांनी थोडी अक्कल अजून फुटली आणि काही प्रश्न पडू लागले. या फुटू लागलेल्या अकलेचं हे असंच असतं. ती फुटू लागली कि जुने गोड समज, अधिष्ठानं, नाती तुटू लागतात. तर मला पडू लागलेले प्रश्न असे कि श्रावण बाळाचे आई वडील अगदी म्हातारे तरी वजनाने निदान प्रत्येकी ३० किलोग्रॅम तरी असतील. त्याच्या कावडीचेच वजन ५ किलोग्रॅम असेल. काशी यात्रेला निघाला होता म्हणजे थोडं फार अंथरायला, पांघरायला, काही जुजबी कपडे, एखादे हत्यार, माफक भूक लाडू, तहान लाडू ( हे लाडू काय व कसे असतील याबतीत माझे मन: चक्षु भरपूर ओव्हर टाइम करून सध्या या बाबतीत ते स्ट्राईक वर गेले आहेत ). तर थोडक्यात सर्व ऐवज ७० ते ७५ किलोग्रॅम च्या घरात. हा सारा ऐवज खांद्यावर मारून दिवसेंदिवस प्रवास करून रात्रीच्या वेळी मिट्ट काळोखात हा नाजूक,गोड श्रावण बाळ जंगलात मुक्कामाला थांबला व पाणी आणण्यासाठी हिंस्र श्वापदं जेथे पाणी पितात अश्या तळ्यावर आला ? शक्यच नाही. हा श्रावण बाळ नक्कीच सहा फूट उंच, रुंद खांद्याचा, भरदार निधड्या छातीचा, पिळदार दंडांचा असणार. त्याच्या आई वडिलांचे वय लक्षात घेता व त्याचा जन्म त्यांच्या उतर वयात झाला असे मानून सुद्धा कमीत कमी २०/२२ चा असावा. 'काय सांगावं त्याला दाढी मिशाही असू शकतील' माझ्या मन: चक्षुनी अजून चोंबडे पणा करून माझ्या मनातील त्याच्या आधीच्या छबीचा पार चक्कचूर करून टाकला. पण मी जसा-जसा विचार करू लागलो तशी-तशीज्ञ श्रावणबाळाची ही नवी छबीच मला जास्त पटू लागली. पण मग त्या कुणा चित्रकाराने असं १४/१५ वर्षाच्या गोड गोड व नाजूक मुलाचं चित्र का काढलं ?

या प्रश्नाचा वाडगा घेऊन उत्तराची भीक मागत मी दारोदार फिरलो. म्हणजे वर्गशिक्षक, व्यायामशिक्षक, घरातले सगळे, मित्र. पण पदरी घोर निराशा आली. ( हे पदरवालं वाक्य एक पुरुष कसं काय बोलू शकतो या माझ्या प्रश्नावर अवाक होऊन एकदा वर्गशिक्षकांनी माझे कान उपटले होते. तर ते असो.) 'नसत्या चौकशा करण्यापेक्षा ते अभ्यासाचं बघा जरा' पासून 'तुझा ना कमरेचा काटा ढिला आणि डोक्याचा स्क्रू टाईट केला पाहिजे एकदा ' पर्यंतची सगळी वाक्य मी ज्ञान पिपासू वृत्तीनं निमूटपणे ऐकून घेतली. फक्त वरील एका वाक्याला कृतीची जोड देण्याचा माझ्या व्यायाम शिक्षकांचा हेतू दिसताच मात्र मी पळ काढला होता. घायकुतीला येऊन मी शेवटी आमच्या दूधवाल्या भय्यालाही विचारून पाहिले. तो मूळचा बनारसचा असून काशीयात्रेचे पुण्य त्याने सहजगत्या कमावले असल्याचे त्याच्याकडून ऐकून होतो. पण बाळ या शब्दाने तो गंडला. 'ऐसा सरनाम तो हमने कभी सुना नाही' असं काहीतरी पुटपुटत पुढल्या रतिबाला सटकला. शेवटी माझ्या एका नाटकवाल्या मित्राने जो माझ्याहून जवळ जवळ १० एक वर्षांनी मोठा होता त्यानी माझी मदत केली. हा मित्र कायम डोक्याची झुल्प व दाढीचे खुंट वाढवून गळ्यात शबनम झोळी अडकवून 'Abstract Theatre' असं काहीतरी धसकावणाऱ्या नावाचं करत असे. 'आयुष्यात काही करायचं असेल तर त्याचा नाद सोड. तो खूप मोठा आहे तुझ्याहून' अश्या दोन परस्पर विरोधी गोंधळून टाकणाऱ्या वाक्यांचा उपदेश आई मला नेहमी त्याच्या बाबतीत करत असे. पण आयुष्यात आणखीन काय करायचे असते ? हे माहित नसल्याने मी तिकडे दुर्लक्षच करत आलो. माझा नाटकवाला मित्र नेहमीच्या बेफिकीरीने म्हणाला 'अरे त्या चित्रकराच्या मन: चक्षुना तो जसा दिसला तसा त्याने चितारला.' हां ही माझ्या ओळखीची भाषा होती. 'हो. पण काही विचार करायचा कि नाही ' असं म्हणत मी माझी ७५ किलोग्रॅमची थेअरी त्याला ऐकवली.

'हा: अरे मेंदू विचार करतो मन नाही . ते फक्त कल्पना करतं. आणि मन जी कल्पना करत ते मन: चक्षुना दिसतं. प्रत्येकाच मन वेगळी कल्पना करतं म्हणून प्रत्येकाच्या मन: चक्षुना वेगवेगळे दिसतं. बाळ या शब्दामूळे त्याच्या डोळ्यासमोर जे आलं ते त्यानं काढलं '. 'अरे पण बाळ हे त्याचं आडनाव असू शकतं ना ! ' मी उगीचच बनारसी भय्याचा पॉईंट घुसडून बघितला.' असलं तरी त्यामुळे काय फरक पडतो ? त्या चित्रकाराला अगदी श्रावण बाळाची गोष्ट ही माहित नसली तरी काय फरक पडतो ? After all it's a question of Artistic Liberty' आं ! लिबर्टी ? ? या शब्दाचं माझं ज्ञान त्यावेळी फक्त या नावाचं एक मस्त सिनेमा थिएटर चर्चगेटला आहे किंवा स्टॅचू ऑफ लिबर्टी चा एक पुतळा अमेरिकेत आहे इथपर्यंतच मर्यादित होतं. त्यामुळे ही कोणती नवीनच लिबर्टी असं मी त्याला विचारलं. 'म्हणजे कलाकाराच स्वातंत्र्य ' 'पण आपण तर सर्वच स्वतंत्र आहोत आता'. माझा युक्तीवाद. 'हो. पण चित्रकार, लेखक, नट इ. कलाकार हे जास्त स्वतंत्र असतात. म्हणजे एखादी गोष्ट जर त्यांना माहित नसेल, किंवा अर्धवट माहित असेल किंवा माहीत असूनही ती त्यांना वेगळी भासत किंवा दिसत असेल तर ती तशी दाखविण्याचं त्यांना स्वातंत्र्य असतं. हे जास्त स्वातंत्र्य.' 'अरेच्या म्हणजे काही विचार न करता फक्त त्याला जसा वाटला तसा माझ्या मनाविरुद्धचा श्रावणबाळ केवळ त्याने त्याची 'आर्टिस्टिक लिबर्टी' जपण्याकरिता चितारला कि काय ?' माझ्या चेहऱ्यावरची घालमेल बघून तो म्हणाला, 'हे बघ तुझही बरोबरच आहे. तुझ्या मन: चक्षुसमोरील ही श्रावणबाळाची नवी छबीच बघायला तू स्वतंत्र आहेसच फक्त त्या चित्रकाराने चितारलेल्या छबीवर तू आक्षेप घेऊन त्याच्या कलाकाराच्या स्वातंत्र्याचा संकोच करू शकतं नाहीस.' अरे बापरे !


माझ्या आयुष्यात त्या दिवशी पासून 'आर्टिस्टिक लिबर्टी' ने जो प्रवेश केला तो अगदी आजपर्यंत. मग हळूहळू तिचे 'सिनेमॅटिक लिबर्टी', 'थिएट्रिकल लिबर्टी', 'पोएटिक लिबर्टी' असे चुलत भाऊ बहिणीही आले. त्यांनी सर्वच क्षेत्रात घातलेला धुमाकूळ सर्व परिचित आहेच . आपण सर्व स्वतंत्र आहोत पण कलाकार हे जास्त स्वतंत्र आहेत हे माझ्या मित्राचं वाक्य आज आठवल्यावर मला George Orwel चे 'All animals are equal but some animals are more equal than the others' हे वाक्य आठवते. अर्थात त्यावेळी मला हे Geoerge Orwel वगैरे प्रकरण माहित नव्हतं ( नशीब त्या George Orwel च )पण माझी श्रावण बाळाची नवी छबी जोपासायला मीही स्वतंत्र आहे हे माझ्या मित्राकडून त्यावेळी ऐकून फार बरं वाटलं.

मात्र त्यामुळं इतका तरणा बांड, तगडा व हाता तोंडाशी आलेला मुलगा जाण्याचं त्याच्या आईवडिलांच दु:ख मला नव्यानं भेटलं आणि श्रावण बाळाच्या आयुष्याचा हृदय द्रावक अंत व दशरथ राजाच्या आयुष्याच्या शोकांतिकेची सुरुवात अधिक क्रूरपणे भिडली. शालेय जीवनातील आंबट गोड आठवणींच्या फळातील बी अशी कडू शार असतेना कधी कधी कि....

**'शर आला तो धावून आला काळ**
**विव्हळला श्रावण बाळ..'**

शर आला तो, धावुनि आला काळ
विव्हळला श्रावणबाळ
हा ! आई गे ! दीर्घ फोडुनि हाक
तो पडला जाऊन झोक.
ये राजाच्या श्रवणी करुणा वाणी
हृदयाचे झाले पाणी.
त्या ब्राह्मणपुत्रा बघुनि
शोकाकुल झाला नृमणी
आसवे आणूनी नयनी
तो वदला, हा हंत ! तुझ्या नाशाला
मी पापी कारण बाळा.
मग कळवळुनि नृपास बोले बाळ
कशी तुम्ही साधली वेळ
मम म्हातारे मायबाप तान्हेले
तरुखाली असतील बसले
कावड त्यांची घेऊन मी काशीला
चाललो तीर्थयात्रेला
आणाया निर्मळ वारी
मी आलो या कासारी
ही लगभग भरुनि झारी
जो परत फिरे, तो तुमचा शर आला
या उरात रुतुनी बसला
मी एकुलता पुत्र, कसा हा घाला
मजवरती अवचित आला
त्यां वृद्धपणी मीच एक आधार
सेवेस आता मुकणार
जा, बघतील ते वाट पाखरावाणी
द्या नेऊन आधी पाणी.
आहेत अंध ते दोन्ही
दुर्वार्ता फोडू नका ही
ही विनती तुमच्या पायी
मजमाघारी करा तुम्ही सांभाळ
होऊनिया श्रावणबाळ.
परि झाकुनी हे सत्य कसे राहील ?
विधिलेख न होई फोल
काळीज त्यांचे फाटुन शोकावेगे
ते येतील माझ्यामागे,
घ्या झारी ... मी जातो .. त्याचा बोल
लागला जावया खोल
सोडिला श्वास शेवटला
तो जीवविहग फडफडला
तनुपंजर सोडुनि गेला
दशरथ राजा, रडला धायी धायी
अडखळला ठायी ठायी.

कवि - ग. ह. पाटील.



प्रसाद आठल्ये
९८२०६ १३४४५

# मुंबई पोलिसांचा विश्वासार्हय प्रयत्न

विलेपार्ले हनुमान रोड येथे शंभर वर्षापेक्षा जास्त जुनी असलेली पितळेवाडी नावाची इमारत आहे. या इमारतीच्या मागील बाजूस छोटीशी बैठकीचाळ असून त्यामध्ये चार ते पाच कुटुंब राहतात. दर्शनी भागामध्ये निरनिराळे दुकाने आहेत साईबाबा चे मंदिर आहे आणि मागील




बाजूस काही कुटुंबे गेले अनेक वर्ष त्या ठिकाणी वास्तव्यास आहेत. त्यापैकीच एक कुटुंब म्हणजे श्रीमती शामल श्याम शिगम यांचे कुटुंब त्यांना दोन मुली होत्या आणि दोन्ही मुलींची लग्ने झालेली होती. त्यापैकी लीना नावाच्या मुलीचे पहिले लग्न इकबाल शेख नावाच्या इसमाबरोबर झाले होते. तिचा नवरा गुन्हेगारी वृत्तीचा होता आणि अनेक वेळा जेलमध्ये गेला होता. लग्नापूर्वी तिला त्याच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची माहिती नव्हती परंतु लग्नानंतर काही दिवसातच तिला सर्व माहित पडले आणि त्यानंतर त्यांच्यामध्ये वारंवार भांडणे होऊ लागली. इकबाल शेख हा सन २००७ पासूनच गुन्हेगारी कृत्यांमध्ये गुंतला होता आणि त्याच्यावर सन २०२१ उजडेपर्यंत २० पेक्षा जास्त गुन्हे दाखल झाले होते. सन २०१७ मध्ये तो जेलमध्ये गेल्यानंतर लीना हिने त्याच्या बरोबरचे सर्व संबंध तोडून टाकले त्याचा राग त्याच्या मनामध्ये होता. तो वारंवार तिला मित्रां करवी अथवा फोन करून धमक्या देखील देत होता. नाईलाजास्तव तिने दुसरे लग्न केले आणि दुसऱ्या पतीबरोबर ती मुंबई बाहेर राहू लागली. तिला पहिल्या पतीची एवढी भीती होती की तिने तिचा सध्याचा पत्ता तिच्या खुद्द आईला देखील सांगितला नव्हता.

आता ती दुसऱ्या नवऱ्यासोबत राहत होती तसेच ती नऊ महिन्याची गरोदर झाली. तिचा पहिला नवरा इकबाल शेख हा गेले चार वर्षे जेलमध्ये होता. दिनांक ०२/०९/२०२१ रोजी तो पॅरोल रजेवर पुणे येथील येरवडा मध्यवर्ती कारागृह इथून सुटून आला होता. सुटून येताच त्याने लीनाचा शोध घेणे सुरू केले आणि तिच्या मैत्रिणींना नातेवाईकांना फोन करणे सुरू केले. लीनाला हे माहित पडताच आणि आपल्या नातेवाईकांना तिचा पत्ता सांगू नये म्हणून विनंती केली तसेच आईच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो तेव्हा आईला पितळेवाडी येथील घरातून हलवावे असे देखील त्यांनी सांगितले.

दरम्यान इकबाल शेख हा विलेपार्ले येथे दाखल झाला त्याने आपल्या मित्रांच्या गाठीभेटी घेतल्या त्यांच्याबरोबर दारू प्यायला एवढेच नाही तर सत्कार हॉटेल येथे येऊन त्याने मालकाला दमदाटी करून त्याच्याकडून दारूच्या बाटल्या आणि काही रक्कम घेतली. त्या ठिकाणाहून तो लीनाच्या आईच्या घरी गेला आईकडे लीनाचा पत्ता मागू लागला परंतु खरोखरच त्या वृद्ध महिलेला तिच्या मुलीचा पत्ता माहीत नव्हता तिने असमर्थता दर्शवल्यानंतर इकबाल शेख याला राग आला आणि त्याने त्या वृद्ध महिलेला शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली. आसपासची घरे एकमेकाला लागूनच होती त्यामुळे त्यांचे भांडण आसपासच्या लोकांनी देखील ऐकले परंतु भीतीपोटी कोणीही मध्यस्थी केली नाही. ती वृद्ध महिला मदतीसाठी याचना करत होती गयावया करत होती परंतु कोणीही तिच्या मदतीला गेले नाही. इक्बाल शेख हा अतिशय खुनशी आणि रागिष्ट गुन्हेगार होता, त्याने कोणतीही दयामाया न दाखवता त्या वृद्ध महिलेची निर्गुणपणे मारहाणी करत होता. ती त्याचा प्रतिकार देखील करू शकत नव्हती त्यातच कोणीही तिच्या मदतीला पण येत नव्हते अशा असह्य परिस्थितीमध्ये इक्बाल शेख याने घरातील फरशी उचलून त्या वृद्ध महिलेच्या डोक्यात घातली, तो घाव वर्मी लागला आणि ती बेशुद्ध होऊन खाली पडली. ती बेशुद्ध पडल्यावर देखील त्याने मारहाण करणे थांबवले नाही. तिच्यावर चाकूने वार केले. ती निश्चित पडली होती तरी पण इकबाल शेख याचा राग शांत झाला नव्हता आणि त्यानी सर्वात वाईट कृती केली ती म्हणजे तिच्या योनीमध्ये हात घालून तिची आतडे बाहेर खेचून काढले. ती मेल्याची खात्री पडल्यावर तो घराबाहेर पडला आसपासचे लोक त्याच्याकडे बघत राहिले कोणीही त्याला पकडण्याचा अडवण्याचा प्रयत्न देखील केला नाही. कोणतीही भीती तमा न बाळगता तो चालत पारले स्टेशन येथे गेला.

दरम्यान विलेपार्ले पोलिसांना एका महिलेने फोन करून या घटनेची थोडक्यात माहिती सांगितली तात्काळ पोलीस त्या ठिकाणी दाखल झाले. या गुन्ह्याच्या तपासाची जबाबदारी गुन्हेगारी तपासात निष्णात असलेले पोलीस अधिकारी श्री राजेंद्र करणे आणि सहायक पोलीस निरीक्षक अर्जुन भोसले यांनी उचलली. त्यांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक अलका मांडवे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अविनाश धर्माधिकारी यांचे मार्गदर्शन प्राप्त झाले. तपासणी वेग घेतला आणि आरोपीचा माग काढत सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री अर्जुन भोसले हे पुण्यापर्यंत पोहोचले आणि पहाटे पहाटेच आरोपीला पुन्हा ताब्यात घेतले. त्या ठिकाणी आरोपींनी पोलिसांशी बरीच झटापट केली परंतु योग्य बळाचा वापर करून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलेच.

आरोपी इकबाल शेख यास केलेल्या कृत्याचा कोणताही पश्चाताप झालेला नव्हता चार वर्षे जेलमध्ये राहिल्यानंतर केवळ एक दिवस तो बाहेर मुक्त होता आणि पुन्हा त्याची जेलमध्ये रवानगी झाली या गुन्ह्यात मात्र त्याला फाशीची शिक्षा होईल या दृष्टीने पोलिसांनी अतिशय उत्कृष्ट तपास केलेला आहे. आरोपी इक्बाल शेख विरुद्ध तांत्रिक पुरावे संबंधित साक्षीदारांचे जाब जवाब परिस्थितीजन्य पुरावे असा भक्कम पुरावा गोळा करण्यात आलेला आहे.

या गुन्ह्याचा तपास विद्युत वेगाने करून गुन्हा घडल्यानंतर काही तासातच आरोपीच्या मुसक्या बांधण्यात पोलिसांना यश आले. अन्यथा या गुन्ह्यावरून समाजामध्ये प्रक्षोभ निर्माण झाला असता कारण त्यामध्ये बरेच निरनिराळे दृष्टिकोन होते. मयत स्त्री हिंदू तर आरोपी मुस्लिम हा एक दृष्टिकोन झाला, इकबाल शेख याने ज्या मुलीशी लग्न केलं होतं ती हिंदू मुलगी होती तो एक दृष्टिकोन होता त्याचप्रमाणे इकबाल शेख याने हा खून अतिशय निरर्घुणपणे करून त्या वृद्ध महिलेच्या योनीमध्ये हात घालून आतडी बाहेर काढली होती त्यामुळे समाजामध्ये चीड निर्माण होण्याची निश्चितच शक्यता होती. अशा परिस्थितीमध्ये पोलिसांवरील विश्वासार्हता कमी होते तसेच त्याचे काही राजकीय पडसाद देखील उमटतात. परंतु विलेपार्ले पोलिसांनी उत्कृष्ट तपास करून वेगाने, तपास करून हा गुन्हा तात्काळ उघडकीस आणून आरोपी विरुद्ध दोषारोप पत्र देखील सादर केले आहे. या गुन्ह्यामध्ये आरोपीला फाशीची शिक्षा होईल असा विश्वास आहे.

मुंबई पोलिसांचे सद्रक्षणाय खलनिग्रणाय हे ब्रीदवाक्य खरे ठरो आणि त्या आरोपीला फाशीची शिक्षा होवो ही ईश्वरचरणी प्रार्थना



**(अविनाश धर्माधिकारी)**
निवृत पोलीस उपअधीक्षक
महाराष्ट्र पोलीस, मो. न. ९९३०६८५८३१

**BiZZ MASTERS**
Celebrating Entrepreneurship

## पार्लेबाझार डॉट कॉम तर्फे व्यावसायिकांसाठी अद्वितीय संधी

व्यावसायिकांचा बिजनेस जास्तीत-जास्त ग्राहकांपर्यंत पोहचावा, व्यावसायिकांना त्यांच्या व्यवसायाला वाव देता यावा यासाठी पार्लेबाझारने (www.parlebazaar.com) **१ऑक्टोबर २०२३ रोजी 'BizzMasters'** हा कार्यक्रम आयोजित केला आहे.

या कार्यक्रमात वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यावसायिकांना आपल्या व्यावसायाबद्दलची माहिती व्हिडिओ, प्रेझेंटेशन इत्यादी साधनांचा उपयोग करून जजेस् समोर मांडण्याची सुवर्ण संधी मिळणार आहे. विशेष म्हणजे हा संपूर्ण कार्यक्रम व्हिडिओच्या माध्यमातून रेकॉर्ड केला जाईल त्याचप्रमाणे संपूर्ण कार्यक्रमाचे 'पार्लेबाझार' (www.parlebazaar.com), च्या युट्युब चॅनेलवर थेट प्रक्षेपण होईल ज्याची लिंक 'आम्ही पार्लेकर'(www.parlekar.com) आणि 'टाऊन पार्ले' (www.townparle.in) या चॅनेलसच्या फेसबुक पेजवर देखिल मिळेल आणि या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या व्यावसायिकाला त्यांचे सादरीकरण व्हिडिओ प्राप्त होतील.

या कार्यक्रमात स्वत:च्या क्षेत्रात नावलौकिक करणाऱ्या डॉ. वृशाली नाडकर्णी, ओम क्रिएशन, साजिरी साडीज्, वि. एम. मुसळूणकर सन्स अँन्ड ज्वेलर्स, मुसळूणकर ज्वेलर्स, आराध्य क्रिएशन, वॉरियर इंक, आसन योगा, अल्ट्रा वेलनेस, सिम्पली होममेड, ओबेरॉन मॉड्यूलर, चेतन शहा, डायनिंग डिलाइट्स्, एम. एच. कॉम्प्युटर्स, तक्ष रियल्टर्स, वेल्थनेस, ग्लोब वॉंडरर् अशा अनेक व्यावसायिकांनी सहभाग नोंदवला आहे.

तुम्हाला देखील तुमचा व्यवसाय जास्तीत-जास्त ग्राहकांपर्यंत पोहचवायचा असेल तर लवकरात लवकर पार्लेबाझार आयोजित **'BizzMasters'** या आपल्या कार्यक्रमात सहभागी व्हा. **'BizzMasters'** मध्ये सहभागी होण्यासाठी आमच्या **८१०४२८६२०२/ ८१६९८२५९६१ या नंबरवर किंवा marketing@parlebazaar.com** या **इ-मेलवर संपर्क साधा.**

**सहभागी झालेले काही व्यावसायिक**

AUM Kreations
Aradhya Creations
ULTRAWELLNESS
VM MUSLUNKAR
Asan Yoga
SAJIREE Exclusive Saree Studio
Muslunkar Silver Jewellery & Articles
M.H.COMPUTERS
WEALTHNESS
Dining Delights
CHETAN SHAH